मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर, २०२३
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष तेविसावे
अंक नववा

गणपतीबाप्पा मोरया!

॥ स्वामी ॥

रणजित देसाई

पुरस्कारासाठी आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

सर्वोत्कृष्ट कादंबरी
३०,०००/-

सर्वोत्कृष्ट कथासंग्रह
२०,०००/-

पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक नववा

संपादक :
अखिल मेहता

संस्थापक संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

– अनुक्रमणिका –

संपादकीय	**४**
विशेष लेख	
मानवतावादी साहित्याचा नंदादीप	
वि.स. तथा भाऊ खांडेकर	८
स्मृतिकोष	१४
विक्रेत्यांच्या नजरेतून	**२२**
पुस्तकाच्या पानांतून	
गॉन गर्ल	२६
द मदर	३२
गॉडफादर ऑफ क्राइम	३८
द रोझाबल लाइन	४६
सियालकोट गाथा	५०
अभिप्राय	**५४**
दिनविशेष	**६२**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

संपादकीय

पायरसीला पायबंद घालू या!

लेखक साहित्य लिहितो व प्रकाशक ते वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करतो. लेखक-प्रकाशक संबंध हे परस्पर स्नेहसंबंधावर व विश्वासावर जपले गेलेले पाहायला मिळतात. हे संबंध भावनिक पातळीवर जरी योग्य असले तरी व्यावसायिक पातळीवर या संबंधांना बळकटी यावी यासाठी लेखक-प्रकाशक करार होणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात अशा पद्धतीने लेखक-प्रकाशक व्यावसायिक संबंध दृढ होताना दिसून येत आहेत. परस्पर विश्वास, स्नेह व व्यावसायिकता याची सांगड यातून घातली गेल्याचे दिसून येते.

साहित्याच्या रूपाने लेखक जिवंत ठेवणे हे आमच्या संस्थेचे ब्रीदवाक्य. लेखकांचे साहित्य वाचकांसाठी सतत उपलब्ध ठेवणे व त्याचे योग्य वितरण करून वाचकांपर्यंत पोहोचवणे. वर्षाअखेर लेखकाचे मानधन देणे ही वर्षानुवर्षे चालत आलेली संस्थेची पद्धत. रणजित देसाई, वि. स. खांडेकर, व. पु. काळे, शंकर पाटील हे लेखक आजही साहित्याच्या रूपाने जिवंत आहेत. याचे श्रेय माझे वडील सुनील मेहता यांना आहे. आजही त्याचप्रमाणे आम्ही संस्थेची कामे अविरतपणे सुरू ठेवली आहेत.

सद्य:स्थितीत 'बुक पायरसी' हा प्रकाशन व्यवसायाला भेडसावणारा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याबाबत गांभीर्याने विचार करण्यासारखी परिस्थिती आहे. पुस्तकाची नक्कल प्रत करून त्याचे वितरण, विक्री करून बुक पायरसी होताना पाहायला मिळते. ही गोष्ट कायद्याने तर चुकीची आहेच; पण यात लेखक, त्यांचे वारस व सरकारी कराच्या माध्यमातून सरकारचेही एकप्रकारे नुकसान होत असते. एक प्रकारे ही

फसवणूक असून अशा प्रकारच्या घटना अलीकडे वारंवार दिसून येत आहेत.

मराठीतील अभिजात साहित्य म्हणून ज्याची आपण गणना करतो त्या बहुतेक सर्वच पुस्तकांची 'पायरसी' झालेली आढळून आली आहे. ययाति, स्वामी, श्रीमानयोगी, छावा, मृत्युंजय, युगंधर, राधेय, बटाट्याची चाळ, वपुर्झा, पानिपत ही त्यामधील काही प्रातिनिधिक स्वरूपातील नावं. मराठी भाषेकरता विचार केला तर ही यादी फक्त प्रसिद्ध अशा पुस्तकांचीच आहे. इंग्रजी व हिंदी साहित्याचा विचार केला तर बरीच पुस्तके ही पायरसीच्या विळख्यात सापडलेली पाहायला मिळतील. इंग्रजीमधील बेस्टसेलर तर सर्रास पुण्या-मुंबईमध्ये फुटपाथवर विक्रीस असलेली आढळून आलेली आहेत. त्यावर कारवाई करायचे असे कितीही ठरवले तरी यावर ठोस असा उपाय आजवर तरी झालेला दिसून आलेला नाहीये.

प्रकाशक म्हणून आम्ही वेळोवेळी यावर आवाज उठवला आहे. इतरही प्रकाशक आता या गोष्टीचा गांभीर्याने विचार करून त्याची दखल घेताना दिसून येत आहेत. आत्तापुरता विचार करायचा म्हटलं तर पुस्तकांची होणारी 'पायरसी' हा कायद्याने गुन्हा आहे, यावर सर्वांनी जागरूकपणे, कटाक्षाने विचार करून या गोष्टीला पायबंद कसा घालता येईल याबाबत विचार करून त्यादृष्टीने उपाययोजना करायला हव्यात. ही गोष्ट करत असताना जेवढ्या जास्त लोकांकडून याबाबत आवाज उठवला जाईल तेवढ्या लवकर यावर सकारात्मक असा काही उपाय निघालेला आपल्याला पाहायला मिळेल.

चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती असलेल्या गजाननाचा उत्सव या महिन्यात साजरा होतो आहे. त्याच्या साक्षीने आपण एक संकल्प करूया, पायरसीला प्रोत्साहन मिळेल अशी कृती करणे कटाक्षाने टाळणे. पायरेटेड पुस्तके विकत न घेता दर्जेदार स्वरूपात प्रकाशित व वितरित होणारी पुस्तकेच खरेदी करणे.

अखिल मेहता

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

Available on

amazonkindle | Google Play Books

Find us on:
facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

available on :
ebook

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

विशेष लेख

मानवतावादी साहित्याचा नंदादीप
वि.स. तथा भाऊ खांडेकर

या महिन्यात पद्मभूषण वि. स. खांडेकर यांचा ४७ वा स्मृतिदिवस २ सप्टेंबर रोजी होता. त्यानिमित्त त्यांचे नातू डॉ. अतुल कापडी यांनी या लेखातून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

कै. वि. स. खांडेकर मराठीतील ज्येष्ठ व पहिले ज्ञानपीठ पुरस्कार विजेते. अनेक साहित्यिक व सर्वसामान्य लोकांनी त्यांच्या साहित्याबद्दल आपले विचार अनेक ठिकाणी लेखबद्ध केले आहेत. लेखक म्हणून त्यांचे माझ्यावर निश्चितच काही संस्कार आहेत. त्यांच्या लेखनाबद्दल माझीही मते आहेत; परंतु आज त्यांच्या पुण्यस्मरणाच्या दिनी, माझे लाडके, प्रेमळ पण शिस्तप्रिय आजोबा, एक जागरूक पालक व सतत इतरांच्या भल्यासाठी विचार करणारे व तशी कृती करणारे भाऊ जास्त परिचित आहेत. श्रेष्ठ लेखक म्हणून अनेक आठवणी वेगवेगळ्या व्यक्तींनी विविध लेख, व्यक्तिचित्रण स्वरूपात नमूद करून ठेवल्या आहेत. त्यामुळे त्यांची लेखक म्हणून मला झालेली ओळख ही आपणा सर्वांसमोर मांडण्यापेक्षा, एक सामाजिक बांधिलकी असलेली, अतिशय पापभिरू पण आपल्या विचार व आचारांवर ठाम श्रद्धा असलेली अशी व्यक्ती म्हणून त्यांच्याबद्दलच्या काही आठवणी मी नमूद करू इच्छितो.

मला त्यांचा लाभलेला सहवास हा माझ्या रम्य बालपणातला एक अनमोल ठेवा आहे. भाऊंच्या अखेरच्या दिवसापर्यंत, मला त्यांचा सहवास लाभला. आज मी जेव्हा मागे वळून बघतो त्यावेळी त्यांच्यातला 'महामानव' मला दिसू लागतो आणि

आपण केवढे भाग्यवान आहोत, याची जाणीव होते. मी खांडेकरांचा मोठा नातू, यामुळे मला त्यांच्याबरोबर सर्व सार्वजनिक व कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होता आले; पण वय लहान असल्यामुळे आपण कुठले प्रसंग लक्षात ठेवले पाहिजेत, हे त्यावेळी कळत नव्हते. अनेक सुप्रसिद्ध लेखक, कवी, कलावंत, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते व नेते अशा अनेक लोकांचा आमच्या घरी सतत राबता असायचा. त्यामुळे यशवंतराव चव्हाणांसारखे मोठे नेते, तर कवी गिरीश, बा. भ. बोरकर, वसंत कानेटकर, दुर्गाताई भागवत अशा अनेक दिग्गजांनी माझ्या बालपणातील आठवणी भारलेल्या आहेत.

भाऊ, प्रकृती अस्वास्थ्यामुळे विश्रांतीसाठी आमच्याकडे इस्लामपूरला राहायला आले होते. त्यावेळी मला शाळेत 'माझी प्रिय व्यक्ती' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेत भाषण करायचे होते. मी भाऊंवरच लिहिलेलं भाषण भाऊंनाच वाचून दाखवलं. त्यांनीही हसतहसत त्याच्यात दुरुस्त्याही करून दिलेल्या मला चांगल्या आठवतात. मी मराठी माध्यमातून शिकत असताना इंग्रजी विषयाची आवड निर्माण होण्यासाठी प्रत्येक सुट्टीमध्ये मला 'रीडर डायजेस्ट' च्या साठवलेल्या प्रती भाऊंकडून भेट मिळत असत. त्यामुळे खूप लवकर इंग्रजी वाचनाची लागलेली सवय आज मला आयुष्यभर उपयोगी पडलेली आहे. भाऊंचं इंग्रजी वाचन दांडगं होतं व प्रचंड स्मरणशक्ती होती. कुठल्या इंग्रजी लेखकाच्या कुठल्या पुस्तकात, कुठल्या प्रकरणात त्यांना पाहिजे असलेला उतारा आहे, हे ते त्यांच्या लेखनिकाला म्हणजे राम देशपांडे किंवा शेवडे गुरुजी यांना सांगताना मी अनेक वेळा बघितले आहे.

त्यांचा दैववादावर अजिबातच विश्वास नव्हता; किंबहुना त्यांचा स्वभाव हा मनुष्यामध्ये देवत्व शोधण्यामध्ये गुंतलेला होता. ते मला साने गुरुजी, शाहू महाराज अथवा अनेक थोर व्यक्तींच्या सामाजिक कार्यांच्या गोष्टी सांगत व त्या व्यक्तींचे समाजासाठीचे योगदान समजावून देत. तो प्रसंग माझ्या बालवयाला कळेल, असा सोपा करून पण रंजकपणे ते सांगत असत. मग ते शाहू महाराजांनी कोल्हापुरात अनेक जाती-जमातींसाठी चालू केलेली वसतिगृहे, शाळा अथवा कोल्हापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी केलेली योजना असो, अशा अनेक गोष्टी. समाजप्रबोधन व व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी सर्वांगीण विचार करण्याची लावलेली सवय हा सगळा तीर्थरूप भाऊंकडून मिळालेला अनमोल ठेवा आहे.

वेगवेगळ्या मार्गांनी व लहान वयाला रुचेल अशा पद्धतीने ते माझ्यात

बुद्धिवादी व विज्ञानवादी विचारांची सतत पेरणी करत असत. ते स्वत: कलाक्षेत्राशी निगडित असूनही विज्ञान व विज्ञानाने शोधलेल्या नवीन वाटा यांचा मागोवा घेणं, हेही त्यांचे सतत चालू असे. मी शाळेत असताना सहाव्या-सातव्या इयत्तेमध्ये विज्ञान-गणित-इंग्रजी या विषयांचे माझे गुण जाणून घेण्यात त्यांना सतत उत्साह असे. यापैकी एखाद्या विषयात जरा जरी कमी गुण मिळाले तर माझ्या आईला प्रेमळ सूचना व पूरक वाचनासाठी वेगवेगळी पुस्तके गोळा करून मला पाठवण्याचा त्यांचा शिरस्ता असे. त्यावेळी अनेक नोबेल पुरस्कारविजेते शास्त्रज्ञ किंवा विज्ञानाशी संबंधित संशोधकांवर आधारित शाळेतील मुलांना वाचून समजतील, अशी पुस्तके मला सतत भेट मिळत असत. त्यामुळे ज्यावेळी माझ्याबरोबरची शाळेतील मुले 'बालकथा' वाचत होती त्यावेळी मला 'आधुनिक विज्ञान', 'इंग्रजी साहित्य', 'रीडर्स डायजेस्ट'सारखी बदलत्या जगाची नोंद घेणारी मासिके यांचे बाळकडू मिळत होते. याचा परिणाम म्हणून मीही कळत-नकळत पूर्णपणे विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी मानसिक जडणघडण असलेला युवक होत होतो. भाऊंनी कधीही रुढी-परंपरा यांच्यावर काही भाष्य केलेलं मला आठवत नाही.

आमच्या संभाषणात सतत मला वाचनाला प्रोत्साहित करण्यासाठी ते वेगवेगळे प्रश्न विचारत असत व जर माझी उत्तरे त्यांना समाधानकारक वाटली तर बक्षीस मिळत असे, तसेच जर ती अपूर्ण वाटली तर माझी मावशी कै. मंदाकिनी खांडेकर हिला मला वाचनासाठी गोळा करण्याची पुस्तके व त्यांची यादी पुरवली जात असे. ती पुस्तके जोपर्यंत मला पोहोचत नाहीत, तोपर्यंत त्यांना धीर नसे. मीही बालसुलभ वृत्तीने त्या पुस्तकांचा फडशा पाडत असे व भाऊंच्या पुढील भेटीत त्यावर बोलायला उत्सुक असे.

हे प्रबोधन फक्त विज्ञानाशी संबंधित नसे, तर क्रिकेट हाही त्यांच्या आणि माझ्यातला एक दुवा होता. त्यावेळी चालणाऱ्या क्रिकेटच्या कसोटी मालिका व त्यामध्ये घडणाऱ्या घडामोडी यावरही त्यांचे पूर्ण लक्ष असे. किंबहुना, क्रिकेट कॉमेन्ट्री समालोचक कुठला चांगला आहे, कुणाचे इंग्रजी कसे चांगले आहे, याचे धडेही मला रेडिओशेजारी बसून मिळत असत. हिंदी पार्श्वगायकांमध्ये के. एल. सैगल, मुकेश व लतादीदी यांच्यावर त्यांचा फारच लोभ होता. मुकेशच्या निधनाची बातमी रेडिओवर ऐकून ते दिवसभर इतके अस्वस्थ होते, की माझ्या वडिलांनी आमच्या फॅमिली डॉक्टरांना त्यांचे बीपी तपासायला बोलवून घेतले. त्यांच्यामुळेच अनेक लेखकांच्या व त्यांच्या चालणाऱ्या

चर्चेमध्ये लुडबूड करायची संधीही मला नेहमी मिळायची. कै. रणजितभाऊ देसाई येऊन भाऊंना लेखन वाचून दाखवायचे व त्यावर त्यांचे मत जाणून घ्यायचे. कधीकधी हे पूर्ण दुपार व संध्याकाळी सहा-साडेसहापर्यंत चालू असायचे. यावेळी भाऊंची बंगल्यासमोर बागेमध्ये फेऱ्या मारायची वेळ व्हायची. तिथेही ही चर्चा चालूच असायची. जर भाऊंच्याकडे आलेले कोणी त्यावेळी नसतील तर हमखास मी त्यांच्याबरोबर फेऱ्या मारत अनेक गप्पागोष्टी करत असे.

त्यांचे स्वत:चे आरोग्य हे कधीच चांगले नव्हते, म्हणून नातवंडांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी ते सतत माझ्या आईला बजावत असत. मी लहान असताना सुदृढ राहण्यासाठी सुकामेवा, दूध नियमित घेतो का, याची ते सतत माझ्या आईकडे चौकशी करत असत. आम्ही नातवंडं सुदृढ राहण्यासाठी उन्हाळी सुट्टीमध्ये आम्हाला मल्लखांब, सूर्यनमस्कार व पोहणे बंधनकारक होते. याची जबाबदारी माझे मामा कै. अविनाश खांडेकर यांच्यावर असे. आमची प्रगती ते मल्लखांब प्रशिक्षक यांच्याकडून जाणून घेत असत. आम्ही जर तिथे जाण्याचा आळस केला तर प्रकृती सुदृढ राहणं कसं आवश्यक आहे, हे ते सतत मनावर बिंबवत असत. अशा छोट्या-छोट्या गोष्टींमधूनसुद्धा त्यांच्यातील प्रेमळ व कुटुंबवत्सल व्यक्तीचे दर्शन होते.

सर्वांत लक्षात राहिलेली मोठी आठवण म्हणजे लतादीदींचा सहवास व घुंगरांच्या किणकिणीसारखा त्यांचा गोड आवाज! एकदा, लतादीदी भाऊंना मिळालेल्या पुरस्कारानंतर त्यांचे अभिनंदन करायला घरी आल्या होत्या. अर्थातच माझा घरी सर्वत्र मुक्त संचार चालू होता. दीदींनी मला विचारले, 'मला ओळखले का?' मी पट्कन 'हो, तुम्ही लता मंगेशकर, तुमची गाणी भाऊंना खूप आवडतात, आणि रोज सकाळी तुमची गाणी रेडिओवर लागली की भाऊ मला 'आता दंगा करू नकोस, मला हे गाणं ऐकू दे' असे सांगतात,' अशी तक्रारच त्यांच्याकडे केली. त्यावेळी त्यांनी मला विचारलं की, माझं कुठलं गाणं तुला आवडतं? मीही पट्कन उत्तर दिलं, 'मोगरा फुलला, मोगरा फुलला...' परंतु त्यानंतर मी त्यांना हे गाणं आत्ताच्या आत्ता म्हणा असा हट्टच धरला. लतादीदी एकदा भाऊंकडे, एकदा माझ्याकडे बघू लागल्या. आमचं घर लोकांनी भरलेलं होतं. मग लतादीदी मला आमच्या वरच्या मजल्यावर घेऊन गेल्या आणि तिथल्या पायरीवर मला मांडीवर घेऊन, त्यांनी 'मोगरा फुलला...' हे गाणं मला पूर्णपणे ऐकवलं. लतादीदी गेल्यावर मला भाऊंनी जवळ घेतलं आणि पाठीवर हात फिरवून सांगितलं, 'अरे, अशा मोठ्या लोकांकडे असे हट्ट

करायचे नसतात. त्यामुळे त्यांना संकोचल्यासारखे वाटू शकते.' त्यानंतरही लतादीदींची भेट झाली; पण मी परत कधीच त्यांच्यापाशी हट्ट केला नाही. आपल्यामुळे दुसऱ्या कोणालाही, कसलाही त्रास होऊ नये याची खूप खबरदारी घेणे, हे भाऊंच्या स्वभावात होतं आणि त्यांचं वर्तनही तसंच होतं.

मला त्यांच्यातील मोठ्या लेखकापेक्षा अतिशय प्रेमळ आजोबा, वडील व कुटुंबप्रमुख हे व्यक्तिविशेष जास्त लक्षात राहिले आहेत. त्यांचे लेखन वाचून त्यातील सामाजिक बांधिलकी, सत्य, अहिंसा व प्रामाणिकपणा या माणसातल्या गुणांवर असलेली असीम श्रद्धा ही खूप नंतर कळू लागली. तोपर्यंत त्यांनी माझी साथ सोडली होती; पण संस्कारांची इतकी माठी शिदोरी बांधून दिली होती, की आजपर्यंत ही शिदोरी अखंड साथ देत आहे. त्यांचे विचार व शिकवण आयुष्यातील प्रत्येक प्रसंगात सतत साथ देत आले आहेत. हा 'ज्ञानरूपी नंदादीप' सतत प्रकाशमान राहो, ही सदिच्छा!

– अतुल कापडी

(वि. स. खांडेकर यांचे नातू)

◆

वि. स. खांडेकर यांचे कुटुंबीय

नवी संहिता... नवा आशय...

स्मृतियात्रा

भा. द. खेर

प्रथितयश साहित्यकार, राजकारणी, पत्रकार, इतिहासकार, कवी यांच्या सहवासाच्या आठवणींचा भा. द. खेरांनी रेखाटलेला ललितरम्य आलेख

किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

स्मृतिगंगा



भा. द. खेर

नामवंतांच्या कार्यकर्तृत्वाची भा. द. खेरांच्या लेखणीतून साकारलेली 'स्मृतिगंगा'

किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

विशेष लेख

स्मृतिकोष

मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांचा १८ सप्टेंबर रोजी २१वा स्मृतिदिवस. साहित्यिक शिवाजी सावंत अनेक लोकांनी शब्दबद्ध केलेले आपल्याला पाहायला मिळतात; मात्र घरी वावरणारे कुटुंबप्रेमी असे शिवाजीराव आपल्याला भेटतील स्मृतिकोष या लेखातून

सावंतसाहेबांना जाऊन वीस वर्षं झाली आहेत यावर विश्वास बसत नाही. ते गेले आहेत का? नाही. 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' म्हणतात तसे ते कीर्तिरूपाने जिवंत आहेतच. माझ्या मनात ते आठवणींच्या रूपाने जिवंत आहेत. त्यांच्याच शब्दांत सांगायचं तर 'आठवणी या झंझावातासारख्या असतात. त्या कुठूनही आणि कशाही येऊ शकतात, इतकंच नाही तर काही वेळा त्या मनाचं शांत सरोवर पार घुसळून सोडतात.' त्यांच्या या शब्दांप्रमाणेच 'मृत्युंजय'च्या रूपाने झंझावातासारखेच, माझ्या आयुष्याचं शांत सरोवर घुसळून टाकतच ते माझ्या आयुष्यात घुसले. आता त्यांच्या स्वभावातच झंझावात होता, त्याला ते तरी काय करणार?

लग्नानंतर पाच वर्षं आम्ही कोल्हापुरात होतो. त्यावेळी सावंतसाहेब 'राजाराम हायस्कूल'मध्ये शिक्षक होते. त्यामुळे ह्यांची लेखनाची वेळ रात्रीची असायची. लवकर लिहायला बसले तर जेवणही झालेलं नसायचं. आणि श्रोता म्हणून मी समोर असणं आवश्यक असायचं. लेखन आणि वाचन संपताच रावसाहेब 'जेवण वाढ'ची ऑर्डर सोडायचे. घरात माझ्याशिवाय दुसरं कोणी बाईमाणूस नसल्यामुळे स्वयंपाक झालेला नसायचा. ''अहो, स्वयंपाक कसा झालेला असेल? झाला की वाढते.'' हे उत्तर यांना चालायचं नाही. घुश्श्यात ''कारणं सांगू नकोस, हो की नाही (म्हणजे वाढतेस की

नाही?) ते सांग.'' असं त्यांनी म्हटल्यावर मीही तडकून म्हणाले, ''हो की नाही, असं उत्तर द्यायला मी काही आरोपी म्हणून कोर्टात उभी नाही. धीर असेल तर अर्ध्या तासात वाढते.'' मग मात्र ते गप्प बसले.

स्वयंपाकाला त्यांनी 'खारट झालंय, अळणी झालंय, तिखट झालंय' अशी नावं कधीही ठेवली नाहीत. कुणाकडे जेवायला गेलं तर गृहिणीनं आपुलकीनं, कष्टानं केलेल्या जेवणाला (स्वयंपाकाला) दाद दिली पाहिजे. म्हणून ते भरपूर स्तुती करायचे. कधी-कधी ते अतीही व्हायचं. एका ठिकाणी आम्ही जेवायला गेलो होतो, त्यांच्याकडचं लोणचं खूप छान आहे, असं म्हणत त्या गृहिणीसमोरच यांनी 'वहिनींना रेसिपी विचार' अशी सूचना मला दिली. खूश झालेल्या गृहिणीनं एक छोटी बाटलीभर लोणचं आम्हाला दिलं. खरं म्हणजे ते लोणचं मला अजिबात आवडलं नव्हतं, त्यामुळे सगळ्या कौतुकाला मी फक्त हूं हूं करत होते. दुसऱ्या दिवशी घरी जेवताना 'ते लोणचं वाढू का,' विचारलं तर 'नको' म्हणाले आणि त्यानंतर पुन्हा काही त्यांनी ते लोणचं खाल्लं नाही.

कधी-कधी जेवणासारखंच मला ह्यांनी कधी एखाद्या नवख्या लेखकाच्या लेखनाचं कौतुक केलेलं वाटायचं; कारण ते लेखन वाचताना, आपण काय लिहिलंय ते लेखकाला स्वत:ला तरी कळलंय का, अशी शंका माझ्या मनात असायची. त्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला यायचं ह्यांनी मान्य केलं तेव्हा मला आश्चर्य वाटलं. मी तसं बोलूनही दाखवलं, तर ते म्हणाले, ''अशा ठिकाणी आपण बारशाला चाललो आहोत , बाराव्याला नाही याचं भान ठेवून बोलायचं असतं - लेखनासाठी थोडंसं उत्तेजन आणि सौम्य शब्दांत थोडंसंच दोषदर्शन. आता मला असं सांग, या मुलानं 'वहिनी कसं आहे माझं पुस्तक?' असं विचारलं तर 'भिकार आहे' असं उत्तर तू देऊ शकशील का?'' सावंतसाहेबांनी मला निरुत्तरच केलं.

इतरांना निरुत्तर करणाऱ्या साहेबांना त्यांची लाडकी लेक तिचं नाव कादंबिनी असलं तरी आम्ही तिला पिंटू म्हणायचो – कधी-कधी अवाक् करायची. त्यावेळी ती सहा-सात वर्षांची असेल. एकदा मी तिला, बाबांना जेवायला बोलाव म्हणून सांगितलं. तिनं दोन-तीनदा हाक मारली; पण तिचे बाबा वाचनात तल्लीन झाले होते. शेवटी चिडून ती म्हणाली, ''अहो बाबा, जेवायला चला की! आई केव्हाची आक्रोश करतीये.'' तिचा तो आक्रोश शब्द ऐकून सावंतसाहेब खाड्कन भानावर आले. हा शब्द कुठून सुचला हिला,

असा प्रश्न त्यांना पडला. चेष्टेनं त्यांनी विचारलं, ''आक्रोश म्हणजे काय ग पिंटू?'' त्यावर ती ठसक्यात म्हणाली, ''म्हणजे ओरडते आहे.'' हसतहसत ''असं असं, ठीक आहे,'' म्हणत सावंतसाहेब जेवायला उठले.

हाताशी असलेल्या प्रत्येक माणसाला काही ना काही काम सांगायची सावंतसाहेबांना सवय होती. एक दिवस त्यांनी पिंटूला एकामोमाग एक 'वही दे, पेन दे, पुस्तक दे,' अशी कामं सांगितली. शेवटी वैतागून ती म्हणाली, ''बाबा, मी काय तुमची दासी आहे का?'' पुन्हा एकदा आ वासून लेकीकडे बघत बसायची वेळ बाबांवर आली. ते खदखदून हसत सुटले .

साधारणपणे घरात एक मुलगा आणि एक मुलगी असेल तर, त्यावेळी तरी कुलदीपक म्हणून मुलाचे जरा जास्त लाड व्हायचे. सावंतसाहेबांनी असा पक्षपात कधी केला नाही हे जेवढं खरं, तेवढंच मुलगी थोडी जास्त लाडकी होती, हेही खरं. म्हणूनच यांनी जर फायलिंग करायला कादंबिनीला समोर बसवलं तर 'बाबा, सगळी पत्रं वाचून झाली की मग ती फाइलला लावायला द्या' असं ती म्हणू शकत होती; कारण ह्यांचं फायलिंग हा भारी प्रकार होता. एक-एक पत्र वाचायचं आणि फाइलला लावायला द्यायचं. वाचकांची खूपच पत्रं यायची तेव्हा. म्हणजे ती वाचायला तास-दीड तास लागला तर फायलिंग करणाऱ्यानं मुकाट्यानं तेवढा वेळ समोर बसून राहायचं आणि हातात देतील तेव्हा एक-एक पत्र फाइलमध्ये लावायचं. बिचारा अमिताभ - मुलगा-मात्र चुपचाप बाबांचं आज्ञापालन करायचा.

माझ्या वडिलांसारखाच मुलांची तब्येत चांगली असली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. स्वत:च्या कामासाठी ते इतरांना पळायला लावत असले तरी यासाठी ते स्वत: परिश्रम घ्यायचे. निरनिराळ्या कुंड्यांमध्ये गहू पेरून त्याच्या रोपांचा रस काढून मुलांना द्यायचे. खारकेचे तुकडे तुपात भिजवून ठेवून मुलांना खायला द्यायचे. त्यांच्याकडून आसनं, व्यायाम करून घ्यायचे. सगळ्या प्रकारच्या खरेदीची खूप हौस असल्यामुळे मुलांसाठी कपडे खरेदी माझ्यापेक्षा तेच जास्त करायचे. ती खरेदी पाहून माझ्या दोन बहिणी छाया आणि माया त्यांना डिवचायच्या, 'शिवाजीराव, पिंटूचे कपडे चांगले महाग दिसतायेत आणि अमिताभचे रस्त्यावरून आणलेत वाटतं!' सुदैवाने या चेष्टेने न चिडता 'शहाण्या आहात' असं म्हणून ते उडवून लावायचे.

त्यांना स्वत:लाही कपड्यांची खूप आवड होती. रंगसंगतीचं त्यांना विशेष ज्ञान होतं असंही नव्हतं. त्यांना मिळालेल्या शालींची जवळजवळ ३५-४०

जाकिटं शिवून घेतली होती. (माझ्याजवळ एवढ्या साड्याही नव्हत्या.) कुठल्याही रंगाला ते 'ब्राऊन' म्हणायचे. त्यामुळे त्यांनी जाकिट मागितलं की मीही चेष्टेने विचारायची 'कुठलं? ब्राऊन, निळं की जांभळं?'

माझ्या सगळ्या साड्याही तेच आणायचे. एका दिवाळीला ते माझ्यासाठी साडी आणायला निघाले तेव्हा मी म्हटलं, ''मला घरात नेसायची साडी नको आहे. चांगली भारी साडी हवी आहे.'' ''बरं'' म्हणून ते बाहेर पडले. रिक्षा करून माझ्या बहिणीच्या छायाच्या घराजवळ गेले. रिक्षातूनच तिला हाक मारली, ''चल, तुझ्या ताईला साडी आणायला जायचं आहे.'' ती रिक्षात बसल्यावर तिला म्हणाले, ''आपल्याला साड्यातलं खूप कळतं असं तुला वाटतं म्हणून तुला घेऊन चाललो आहे.'' तिनंही झटक्यात उत्तर दिलं, ''वाटत नाही नुसतं, कळतंच मला.''

तिला घेऊन त्यांनी नुसत्या दोन साड्या नाही, पोवळ्याचा नेकलेस, बांगड्या, अंगठी असा दागिन्यांचा सेट मला सरप्राइज देण्यासाठी खरेदी केला.

कपडे, दागिने यांची खरेदी ठीक होती; पण रोजची भाजीखरेदी फार त्रासदायक होती. जे आणू नका म्हणून सांगितलं असेल ते हटकून घेऊन यायचे आणि जे आणायचं ते विसरून यायचे. ते पाहून माझी चिडचिड झाली की म्हणायचे, ''तू असं का करत नाहीस! जे आणायचं असेल ते आणू नका म्हणून आणि जे आणायचं नसेल ते आणा म्हणून सांगत जा.'' असं म्हटल्यावर कपाळाला हात लावण्याशिवाय दुसरं काय करणार मी!

ह्यांना कसली हुक्की, लहर कधी येईल आणि ती कधी संपेल हे सांगता यायचं नाही. एके काळी दिवसातून तीन-तीन पाकिटं सिगारेट्स ओढायचा अतिरेक त्यांनी केला आणि अचानक एक दिवस सिगरेट ओढणं बंद केलं. मग फॅड सुरू झालं इप्को टूथपेस्टचं. ही तंबाखूची टूथपेस्ट ते तीन दिवसांत एक संपवायचे. कुठेही टूथपेस्ट लावायची लहर त्यांना यायची. सिनेमा थिएटरमध्येसुद्धा. मग हेही एक दिवस बंद झालं. आपोआपच.

सावंतसाहेबांचं क्रीडाप्रेम हे मात्र हुक्की, लहर, फॅड नव्हतं. शालेय वयात ते उत्कृष्ट कबड्डी खेळाडू होते. टीव्हीवर टेनिस, बॅडमिंटन, क्रिकेट या सर्व खेळांच्या मॅचेस ते पहिल्या दिवसापासून शेवटपर्यंत पाहायचे. अशावेळी टीव्हीचा रिमोट सर्वस्वी त्यांच्याच हातात असायचा. त्यांच्यामुळे कादंबिनीलाही टेनिसची आवड लागली.

घरातून बाहेर पडताना नटण्यासाठी बायकांना जेवढा वेळ लागतो त्यापेक्षा

जास्त वेळ सावंतसाहेबांना लागायचा. पॅन्ट, शर्ट, शर्टावर जाकिट, जाकिटावर ट्विडचा कोट, डोक्यावर तिरकी बसवलेली बॅरेट कॅप, हिलमनची पेस्ट लावून मिश्यांची टोकं अक्कडबाज पीळ भरलेली, असा जामानिमा करून तीनतीनदा स्वत:ला आरशात न्याहाळायचं आणि माझ्याकडं पाहून प्रश्नार्थक डोळे मिचकवायचे म्हणजे 'कसा दिसतोय?' असं विचारणं. एवढं सगळं झालं की परफ्यूमचा स्प्रे फवारून घ्यायचा. एकदा परफ्यूम संपला होता तर साहेबांनी बेधडक रूमफ्रेशनरच फवारून घेतला. आणि ''अहो, ते परफ्यूम नाही, रूम फ्रेशनर आहे,'' असं मी सांगितलं तर ''गप्प बस'' म्हणून माझ्यावर डाफरले. अर्थात गप्प बसण्याशिवाय दुसरं काय करू शकणार होते मी!

मुलांच्या वस्तू आणण्यासाठी मी मागितलेले पैसे जास्त वाटले तर ते विचारायचे, ''एवढे पैसे कशाला पाहिजेत?'' स्वत: तर हवे तेवढे पैसे खर्च करतात आणि मला मात्र पैशांचा हिशोब विचारतात याचा राग येऊन मीही उत्तर द्यायचे, ''शनिवारवाड्यावर उभं राहून उधळायला हवे आहेत पैसे. देणार आहात की नाही?'' मी एवढी चिडल्यावर काही न बोलता ते पैसे द्यायचे. खरं म्हणजे मुलांचे जास्त लाड मी कधीच केले नाहीत. ते तर ह्यांनीच केले. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी अमिताभने माझ्याकडे शूजसाठी दोन हजार रुपये मागितले होते. एवढे महागडे शूज मी घ्यायचं नाकारल्यावर त्यानं ते बाबांकडे मागितले आणि बाबांनीही खुशाल दिले. त्यानंतर अमिताभ त्याला हव्या असलेल्या वस्तू बाबांकडूनच वसूल करायला शिकला.

कादंबिनीचं लग्न झाल्यावर ती पती परागबरोबर अमेरिकेत स्थायिक झाली. एकदा येताना कौतुकानं तिनं बाबांसाठी बाथरोब आणला. तो गुबगुबीत टर्किश बाथरोब ह्यांना खूप आवडला. ''अहो, तो टॉवेल आहे, अंघोळ झाल्यावर अंग पुसण्याइतकाच त्याचा उपयोग असतो.'' हे माझं सांगणं नेहमीप्रमाणे धुडकावून लावून 'रोमन सम्राटाच्या झग्यासारखाच' ते वापरू लागले. अंघोळ झाल्यावर बाथरोब तसाच अंगावर ठेवून ते बाहेरच्या खोलीत येऊन खुर्चीवर बसायचे. त्यांना कोणी भेटायला आलं तरी 'रोमन सम्राटाच्या' वेशातच सावंतसाहेब त्यांची भेट घेत. उन्हाळा सुरू झाल्यावर त्या बाथरोबमध्ये घामाघूम व्हायला झालं तेव्हा त्यांनी तो वापरणं बंद केलं.

आपल्या सर्व वस्तू हाताशी असाव्यात म्हणून एकदा ह्यांनी स्टीलचं चारफुटी कपाट विकत घेतलं. नवीन कपाट मी पाहायला लागले तर

कपाटाच्या मागच्या बाजूला भोकं असलेली मला दिसली. मी ह्यांना म्हटलं, ''त्या दुकानदारानं तुम्हाला फसवलं आहे. हे परत करा.'' त्यावर सावंत-साहेबांनी चार-पाच खिळे, हातोडी घेतली आणि खिळे ठोकून ती भोकं बुजवून टाकली. हात थोडा लांब केला तर वस्तू हाताला लागतील एवढं स्वत:च्या खुर्चीजवळ ठेवलं. ही सोय करूनही त्यातल्या वस्तू घेण्यासाठी, 'अगं पेन दे, कागद दे, पुस्तकं दे' हे चालूच राहिलं. लग्नात ह्यांनी माझं नाव 'मृणालिनी' ठेवलं होतं; पण त्या नावानं हाक मात्र कधीच मारली नाही. आणि मलाही अगंचीच सवय होऊन गेली.

रिक्षावाल्यांशी ह्यांचं फार पट्कन सख्य व्हायचं; कारण रिक्षात बसल्यावर लगेच ह्यांची रिक्षावाल्याला प्रश्नावली सुरू व्हायची, 'तुझं नाव काय?' कुठल्या गावचा? कुठल्या शाळेत शिकलास? शिक्षक कोण होते?' वगैरे वगैरे. मंडईच्या बाहेर रिक्षा उभी करायची आणि कुठून काय भाज्या आणायच्या हे सांगून रिक्षावाल्यालाच भाजी आणायला पिटाळायचं. आश्चर्य म्हणजे रिक्षावाले ते ऐकायचे. एकदा तर ह्यांनी गंमतच केली. रिक्षातून एका दुकानात गेले, रिक्षावाल्याला थांबायला सांगितलं. काम झाल्यावर आपण रिक्षा थांबवली आहे हे विसरून दुसरी रिक्षा करून निघून गेले. वाट बघून कंटाळलेल्या रिक्षावाल्याने 'कॅपवाले गृहस्थ कुठे आहेत?' म्हणून विचारलं तेव्हा 'ते तर केव्हाच निघून गेले' असं दुकानदारानं सांगितलं. आपले भाड्याचे पैसे बुडले म्हणून तणतणणाऱ्या रिक्षावाल्याला दुकानदारानं आमच्या घराचा पत्ता दिला आणि 'तुझे पैसे बुडणार नाहीत' असं सांगितलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी रिक्षावाला आमच्या दारात हजर झाला. त्याचं म्हणणं ऐकून त्याचे पैसे - चौदा रुपये सावंतसाहेबांनी त्याला दिले आणि ते मिळाल्याची पावती त्याच्याकडून लिहून घेतली. ते पाहून 'धन्य आहात बुवा तुम्ही' असं म्हणून हातच जोडले मी त्यांना.

रिक्षावाल्यांपासून ते मोठमोठे सरकारी अधिकारी, कारखानदार, राजकीय नेते ह्यांच्या साहित्याचे चाहते होते. माझ्या चांगलंच स्मरणात आहे की १९७८मध्ये ह्यांना झालेल्या एका ॲक्सिडेन्टनंतर मुंबईच्या जसलोक हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करवून पुढच्या सर्व खर्चाची व्यवस्थाही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. असे होते यांचे चाहते. आणि हे स्वत: ज्यांचे चाहते होते अशा दोन श्रेष्ठ व्यक्तींचे पाय आमच्या छोट्याशा घराला लागले होते. एक म्हणजे पं. जसराजजी आणि दुसरे कविवर्य सुरेश भट. पंडितजींच्या

आगमनानं, त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वानं आमचं घरही प्रसन्न झालं होतं आणि कविवर्य सुरेश भटांच्या काव्यगायनाची धुंदी आमच्या घरानं अख्खी रात्र अनुभवली होती.

काव्य, साहित्य, संगीत यामध्ये सावंतसाहेब जेवढे मग्न होऊन जायचे तेवढे पुजेतही. पूजा म्हणजे मानसपूजा. ध्यानधारणा. माझी रोजची पूजा झाली की हे देवासमोर बसायचे. त्यापूर्वी त्यांची स्वत:ची जय्यत तयारी झालेली असायची. भगव्या किंवा केशरी रंगाची लुंगी, खांद्यावर केशरी किंवा पांढरं उपरणं, भव्य कपाळावर उभं गंध रेखलेलं. हा त्यांचा पुजेचा वेश असायचा. पं. जसराजजींनी गायलेल्या उमा-महेश्वर स्तोत्रात 'नमो नम: शंकर पार्वतीभ्याम्' अशी ओळ आहे. गंभीरपणाचा आव आणून पुजेला बसताना ते मला म्हणायचे, ''अगं, ते शंकर, पार्वतीला भितो ना ते स्तोत्र लाव.''

चेष्टेचा भाग सोडला तर त्यांचा ध्यानभंग झालेला त्यांना चालायचा नाही. आणि ध्यान संपल्यानंतरही बराच वेळ ते तंद्रीत असायचे. ह्या तंद्रीसारखीच त्यांची लेखनाची तंद्री लागली की मध्ये काही बोललेलं त्यांना चालायचं नाही. 'युगंधर'ची पहिली एक-दोन पानं सोडली तर पुढचं आठ-नऊशे पानांचं डिक्टेशन मी घेतलं आहे. जो प्रसंग लिहायचा तो त्यांच्या डोक्यात असायचा. त्यामुळे त्यांचा धबधबा सुरू झाला की मला सांगायला लागायचं, 'थोडा स्पीड कमी करा.'

एखादा प्रसंग रिपीट होतोय असं मी सांगायचा प्रयत्न केला तर म्हणायचे ''मध्ये बोलू नकोस. माझी लिंक तुटते.'' प्रसंग लिहून झाल्यावर मी सांगितलं, ''अहो, हे आपण मागच्या प्रकरणात लिहिलंय.'' तर वैतागून म्हणायचे ''आधीच का सांगितलं नाहीस? आता काय मी सगळं परत लिहू का?''

दोन्ही वेळेला मला गप्पच राहायला लागायचं.

कधी चिडचिड करायला लावणाऱ्या, कधी खदखदून हसायला लावणाऱ्या तर कधी गंभीर व्हायला लावणाऱ्या अशा सावंतसाहेबांच्या असंख्य आठवणींनी माझा स्मृतिकोष खच्चून भरला आहे. कुठली आठवण उसळी मारून कधी वर येईल ते सांगता येत नाही. एकटीच असताना त्यांच्या कधीतरी विचित्र वागण्याच्या आठवणींनी मी स्वत:शीच हसते. ते आता नाहीयेत असा विचार मनात येण्याऐवजी, दुसरीकडे कुठेतरी वीस वर्षांपूर्वी जन्म घेतलेले सावंत-साहेब आता वीस वर्षांचा तरुण असतील. काय करत असतील ते? की ह्या जन्मी अपूर्ण राहिलेलं लेखनाचं स्वप्न पूर्ण करत असतील? तसंच असो.

– मृणालिनी शिवाजीराव सावंत

नवी संहिता... नवा आशय...

समर्थ

मंजुश्री गोखले

रामदासांचं 'समर्थ'पण अधोरेखित करणारी कादंबरी



किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

सूर भरला अंतरी

भा. द. खेर

भा. द. खेर यांच्या नादमय लेखणीतून उतरलेली विख्यात संगीतकारांची व्यक्तिचित्रे



किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

वितरकाच्या नजरेतून

भारतीय पुस्तकालय, लातूर

माझ्या वडिलांनी१९६७ साली दुकानाची स्थापना केली. आज या गोष्टीला ५६ वर्षं झाली. त्यापूर्वी हैदराबादला वडिलांचं काकांसोबत 'महाराष्ट्र बुक डेपो' म्हणून दुकान होतं. तिथे पंधरा वर्षं कामाचा अनुभव होता. लातूरसारख्या ग्रामीण भागातील लोकांची धार्मिक व शैक्षणिक पुस्तकांची सोय व्हावी, प्रसार व्हावा म्हणून लातूर येथे चालू केले. सुरवातीपासूनच आम्ही धार्मिक, शैक्षणिक, ललित साहित्य अशी पुस्तके ठेवत आलो. आम्ही चौघं भाऊ आहोत. मोठा भाऊ बँकेत आहे. बाकी आम्ही तीन जण व आई पुस्तक व्यवसायात आहोत. मी आणि आई 'भारतीय' पुस्तकालय-मध्ये व लहान दोन भाऊ रवि, किरण हे 'विद्याभारती प्रकाशन' व शालेय साहित्याचे दुकान पाहतात. एकूण, 'कुटुंब रंगलंय व्यवसायात.'

इतर गावांमध्ये, जसं नांदेड व परभणी इथे लातूरपेक्षा ललित साहित्य घेण्याकडे लोकांचा कल जास्त आहे. लातूरमध्ये माहितीपर पुस्तके घेण्याकडे जास्त कल आहे; पण पुस्तकांच्या विक्रीसाठी वातावरण चांगले आहे. सुरवातीच्या काळात कथा कादंबरी, पाककला यांना मागणी जास्त होती. वाचक पेपरमधील जाहिरातींची कात्रणं आणून बुकिंग करायचे व आम्ही मागवून द्यायचो; पण सध्या पेपरमधील जाहिरातींचा जास्त उपयोग होतो असं वाटत नाही. पूर्वी आम्ही पुस्तकविक्रीसाठी मोठे धार्मिक कार्यक्रम, साहित्य संमेलन, शाळा-कॉलेजमधील कार्यक्रम अशा ठिकाणी स्टॉल लावत होतो. १९९० पर्यंत लोकांचा प्रतिसाद कमी होता. नंतर मात्र विक्री वाढत गेली. मेहता पब्लिशिंग हाऊसची पुस्तके सुरवातीपासूनच आकर्षक कव्हर, मजकुराचा दर्जा, किंमत, मांडणी सर्वच चांगले असल्यामुळे

आम्हाला नवीन लॉट येण्याची वाट पाहत असतो. मध्यंतरीच्या काळात अशी चर्चा होती की, टीव्ही, मोबाइल आणि इतर गोष्टींमुळे वाचनसंस्कृतीवर काही परिणाम झाला आहे का? परंतु तसं अजिबात झालं नाही. उलट जयंत नारळीकर, अच्युत गोडबोले यांची पुस्तके यायला लागल्यावर पुस्तकांचा खप अधिक वाढला. आम्ही पुस्तकांच्या विक्रीसाठी ग्राहकांचे ग्रूप करून ठेवले आहेत. नेहमीचे ग्राहक, नवीन ग्राहक, साहित्यिक व विषयाप्रमाणे ग्रूप्स तयार केले आहेत. त्यांना नवीन पुस्तके आल्यानंतर पुस्तकांचा फोटो व त्यातील थोडक्यात माहिती, किंमत व्हॉट्सॲपवर पाठवतो आणि याला चांगला प्रतिसाद मिळतो. विक्री वाढली आहे आणि सध्या शासकीय कार्यक्रमांत व इतर कार्यक्रमांत हार आणि पुष्पगुच्छ देण्याऐवजी चांगली पुस्तके भेट देण्यावर पण खूप भर आहे. आमच्याकडे एका पुस्तकापासून शंभर पुस्तकांपर्यंत पुस्तके खरेदी करतात. तसेच आमच्याकडे शाळेतील विद्यार्थी वाढदिवसानिमित्त वर्गातील मुलांना पुस्तके भेट देतात. ज्येष्ठ नागरिक त्यांच्या वजनाएवढी पुस्तके कार्यक्रमात अथवा शाळेला भेट देतात. अलीकडे कथा, कादंबरी, कविता अशा काल्पनिक पुस्तकांपेक्षा व्यक्तिमत्त्व विकसन, आरोग्य, अर्थविषयक, ज्यांच्यामुळे समाजात बदल झालाय अशा लोकांची चरित्रं, आत्मचरित्र, जीवन जगण्याची कला, विक्रीकला अशा पुस्तकांचा खप खूप वाढला आहे. पुस्तकांचा दर्जा चांगला असल्यास ग्राहक किमतीची पर्वा करत नाहीत.

तरुण मुलांमध्ये वाचनाची क्रेझ खूप आहे. 'रिच डॅड, पुअर डॅड,' शरद तांदळेंची दोन पुस्तके 'रावण,' 'द आंत्रप्रेन्युअर,' 'इकिगाई', 'द पॉवर ऑफ सबकॉन्शस माइंड,' 'थिंक ॲन्ड ग्रो रिच,' 'गोष्ट पैसापाण्याची' अशी जवळपास शंभर पुस्तके आहेत, जी दुकानदारांना कायम स्टॉकमध्ये ठेवावी लागतात. त्याचबरोबर 'श्यामची आई,' 'छावा,' 'मृत्युंजय,' 'ययाति,' 'युगंधर', अण्णा भाऊ साठे यांची 'फकिरा,' 'उपरा,' 'बलुतं,' 'कोल्हाट्याचं पोर,' 'बनगरवाडी' आणि पु. ल. देशपांडे यांची सर्व पुस्तके. या पुस्तकांचा खप कायम आहे.

ॲमेझॉन आल्यानंतर आणि ऑनलाइन सेल चालू झाल्यानंतर काही दिवस किमतीवरून विक्रीसाठी त्रास झाला; परंतु सध्या तेवढा नाही. दहा-मधील दोन-तीन परत जातात. बाकी घेतात. एखाद्या नवीन लेखकाचं पुस्तक आल्यानंतर ठरावीक गावांत लेखकाचे कार्यक्रम ठेवल्यास पुस्तकांची विक्री व प्रसिद्धी होऊ शकते.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पुस्तक विक्रेता आणि ग्राहक यांचे नाते चांगले असल्यास ग्राहक आपल्याशिवाय कोठेही जात नाही. सध्या पुस्तकविक्रीसाठी सोशल मीडियाचादेखील चांगला उपयोग होत आहे, बरेच ग्राहक मोबाइलवर फोटो दाखवून पुस्तकांची मागणी करतात. या व्यवसायात मनापासून काम केल्यास आपण स्थिर होऊ शकतो, आपली प्रगती होऊ शकते, असा आमचा विश्वास आहे, अनुभव आहे.

– उदय भानुदास जोशी

नवी संहिता... नवा आशय...

एल्विंकीज रुनकोट

रॉबर्ट क्रेस

अनुवाद

सुरेश देशपांडे



एल्विस कोलच्या फक्कड कारनाम्यांचा रंगतदार प्रवास...

किंमत : ४८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

क्रांतिपथ



लक्ष्मण माने

भटक्या-विमुक्तांनी आंबेडकर नावाच्या
निळ्या सूर्याला घातलेली
काव्यरूपी आर्त साद

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

का कराचं शिकून?



लक्ष्मण माने

शिक्षणाचा प्रवाह आमच्यापासून लांब...
प्रवाहापर्यंत पोचलं तरी भाकरीची मारामार...
का कराचं मग शिकून?

किंमत : १६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



गॉन गर्ल

गिलियन फ्लिन

अनुवाद

सई साने

स्वत:च्याच खुनाचा बनाव रचला ॲमीने...तिच्या नवऱ्याला, निक्‌ला अडकवण्यासाठी...निक्‌ही देऊ पाहत होता शह... ॲमी-निक्‌च्या परस्परांवरील कुरघोड्यांचं रंगतदार, थरारक चित्रण

ॲमी इलियट डन्

५ जुलै, २००८

डायरीतील नोंद

मी प्रेमानं फुलले आहे! मायेनं भरले आहे! भक्तीनं काठोकाठ ओसंडते आहे! वैवाहिक सौख्यानं भारलेली, उत्साही, भिरभिरणारी फुलमाशी असावी तशी वाटत्येय मी मलाच! मी त्याच्या अवतीभोवती गुणगुणते, नाचते, भिरभिरते. मी कोणी वेगळीच

वाटत्येय. मी आता पत्नी आहे. मी संभाषणाचं तारू जाणीवपूर्वक वळवते– केवळ त्याचं नाव मोठ्यानं उच्चारता यावं म्हणून. मी आता पत्नी आहे. माझा स्वतंत्रपणा आता मी गमावला आहे, पण मला त्याची पर्वा नाही. मी त्याचे हिशेब सांभाळते, त्याचे केस सारखे करून देते. मी अगदी जुनाट असल्यासारखं वाटतंय. मी माझ्या झुलणाऱ्या कोटात लाल लिपस्टिक लावून ब्यूटीपार्लरकडे निघालीये. मला कशाचीच पर्वा नाही. सगळं आता छानच होईल, असं मला वाटतंय. आयुष्यात निर्माण होणारी प्रत्येक अडचण, कटकट आता फक्त संध्याकाळी जेवताना बोलण्याचा विषय म्हणून उरली आहे. मग आज असं झालं, हनी ... हा हा हा! इतकी मज्जा आली ना!

निक कसा आहे सांगू? एखाद्या उत्तम जमलेल्या पेयासारखा. प्रत्येक गोष्टीला तो एक योग्य परिमाण देतो. वेगळं परिमाण नव्हे तर योग्य परिमाण. तो बरोबर असताना मला कशामुळेच फरक पडत नाही. म्हणजे समजा माझं इलेक्ट्रिकचं बिल उशिरा आलं किंवा माझं नवीन शब्दकोडं तितकंसं जमलं नाही, तरी ठीक आहे. (माझं सगळ्यात अलीकडचं, मी गंमत नाही करत : 'तुम्हाला कोणत्या प्रकारचं झाड व्हायला आवडेल! मला सफरचंदाचं झाड व्हायला आवडेल!' याला काहीच अर्थ नाही) नवीन अमेझिंग ॲमीच्या पुस्तकावर अगदी विखारी टीका झाली आणि जेमतेम बरी सुरुवात होऊन त्याच्या खपाचे आकडे अजून कमी झाले; होऊ दे. खोलीला कोणता रंग द्यायचा, किंवा आमच्या कचऱ्यातील सामानाचा व्यवस्थित पुनर्वापर होतो का... (मला एकदा कळू देतच) मला कशाचाच फरक पडत नाही; कारण मला माझा जोडीदार मिळाला आहे. तो आहे निक्. शांत, संयमी, स्मार्ट आणि मजेशीर, साधा, सरळ, आनंदी, छान, भरदार.

माझ्या स्वतःतील मला न आवडणाऱ्या गोष्टी मनाच्या मागच्या कोपऱ्यात ढकलल्या गेल्या आहेत. कदाचित त्याच्यामधला हाच गुण मला खूप आवडतो, ज्या पद्धतीनं त्यानं माझ्यात बदल घडवलाय. माझ्या भावना नाही बदलल्या, मलाच बदललं. आता मी वेगळीच आहे. आनंदी, हसरी, उत्साही. मला खूप सुखी आणि समाधानी वाटतंय. मी आता पत्नी आहे. काहीतरी वेगळंच वाटतंय, हे शब्द उच्चारताना. (खरंच हे पुनर्निर्माण आहे- न्यूयॉर्क)

आम्ही काहीतरी फालतू गोष्टी करतो. म्हणजे गेल्या आठवड्याच्या शेवटी आम्ही डेलावेअरला गेलो होतो; कारण आम्ही कधीही डेलावेअरमध्ये प्रेम केलं नव्हतं. ते आता खरंतर घडून गेलं आहे म्हणून मी तुम्हाला त्याचं

वर्णन करते. आम्ही राज्याची सीमा ओलांडतो–डेलावेअरमध्ये तुमचं स्वागत आहे! तिथे पाटी लावली आहे. आणि 'आश्चर्यकारक', आणखी 'पहिलं राज्य' आणि शिवाय 'करमुक्त खरेदीचं माहेरघर.'

डेलावेअर बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं राज्य.

जो पहिला कच्चा रस्ता दिसतो तो मी निक्ला दाखवते. आम्ही पाच मिनिटं तसंच पुढे जातो. आता चारही बाजूंनी पाईनच्या झाडांनी आम्हाला वेढलेलं असतं. आम्ही एक शब्दही बोलत नाही. तो त्याची सीट मागे ढकलतो. मी माझा स्कर्ट वर ओढते. आत मी काहीच घातलेलं नाही, मला त्याचा कोरा चेहरा आणि झिंगल्यासारखे डोळे दिसतात. उत्तेजित झाल्यावर त्याचा चेहरा असाच होतो, मला माहिती आहे. त्याच्याकडे पाठ करून मी त्याच्यावर चढते. माझा चेहरा समोरच्या काचेकडे आणि माझं पूर्ण शरीर समोरच्या चाकावर दाबलं गेलेलं आहे. आम्ही एकत्रित हालचाल करतो तेव्हा हॉर्न बारक्या शिट्ट्यांसारखा वाजतो. माझे हात समोरच्या काचेवर घसरल्यासारखे आवाज करतात. निक् आणि मी कुठेही प्रेम करू शकतो. आम्हाला कशाचीच भीती वाटत नाही; उलट जरासा अभिमानच वाटतो. मग आम्ही घरी यायला निघतो. वाटेत बीफ जर्की खातो आणि अनवाणी पायांनी गाडी चालवतो.

आम्हाला आमचं घर फार आवडतं. हे घर अमेझिंग ॲमीने बांधलंय. ब्रुकलीनमधलं हे घर जे माझ्या आई-वडिलांनी आमच्यासाठी घेतलंय. इथून मॅनहटनचा एक मोठ्ठा भाग दिसतो. ते खूप महाग आहे; मला अपराधी वाटतं त्यामुळे, पण ते अगदी परिपूर्ण आहे. मी शक्य तेवढा माझ्यातल्या लाडावलेल्या श्रीमंत मुलीला ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करते. शक्य तेवढं स्वावलंबन. दोन आठवड्यांतले शनिवार, रविवार आम्ही स्वतःच भिंती रंगवल्या. पोपटी, फिका पिवळा आणि मखमली निळा म्हणजे असे रंगवायचे होते, पण आम्हाला हवे तसे कोणतेच रंग उतरले नाहीत, पण आम्ही ते आवडून घेतले. चोरबाजारातून छोट्या छोट्या वस्तू आणून आम्ही आमचं घर सजवलं. निक्च्या रेकॉर्डप्लेयरकरता आम्ही रेकॉर्ड्स आणल्या. काल रात्री आम्ही जुन्या पर्शियन गालिच्यावर वाईन घेत बसलो असताना, हळूहळू अंधार झाला आणि अचानक समोर मॅनहटन झगमगून उठलं, आणि निक् म्हणाला, ''हे असंच चित्र मी माझ्या मनाशी रंगवलं होतं... अगदी असंच!''

वीकेन्डना आम्ही बिछान्यात पडून एकमेकांशी बोलतो. उजळ पिवळ्या रंगाच्या दुलईनं आमचे चेहरे उबदार झालेले असतात. पायाखालची लाकडी

तख्तपोशीपण इतकी छान आहे. दारातून आत येताना दोन कुरकुरणाऱ्या फळ्या आहेत. जणू काही आम्ही आत पाऊल टाकलं की त्या आम्हाला हाक मारतात. मला ते फार आवडतं. हे सगळं आमचं आहे, हेच मला फार आवडतं. आमच्याकडच्या त्या प्राचीन दिव्यामागची किंवा कॉफी टेबलवर असणाऱ्या ओबडधोबड मातीच्या मगच्या मागे एक कहाणी आहे. मी त्याच्याकरता करता येतील अशा छान छान गोष्टींचा विचार करण्यात दिवस घालवते. त्याच्याकरता पेपरमिंटच्या वासाचा साबण आणावा का, जो एखाद्या उबदार दगडासारखा त्याच्या तळव्यात विसावेल की एखादा ट्राऊट माशाचा तुकडा? त्याचा एखादा छानसा पदार्थ करून त्याला वाढता येईल, त्याच्या जुन्या बोटीवरच्या दिवसांची आठवण करून देणारा. मला माहिती आहे हे सगळं वेडगळपणाचं आहे, पण मला ते आवडतंय. मला वाटलं नव्हतं मी कधी एखाद्या माणसासाठी इतकी वेड्यासारखी वागेन. हे वेगळं आहे. मी त्याच्या मोज्यांबद्दलसुद्धा वेडी आहे, जे तो कसेही चोळामोळा करून टाकतो. जणू काही ते एखाद्या कुत्र्याच्या पिल्लानंच दुसऱ्या खोलीतून आणून टाकले असावेत.

आमच्या लग्नाचा पहिलाच वाढदिवस आहे आणि मी प्रेमानं फुलले आहे. खरंतर लोक आम्हाला सांगत होते की पहिलं वर्ष खूप अवघड असतं, जणू काही आम्ही दोन मूर्ख मुलं युद्धावर निघालो होतो. काही कठीण नव्हतं. आम्ही एकमेकांशी बांधले गेलो होतो. आमचा पहिला वाढदिवस आहे आणि निक् दुपारी कामावरून जेवायच्या वेळी घरी येणार आहे. माझा खजिन्याचा शोध त्याची वाट बघतोय. त्याचे सगळे क्ल्यू आमच्याबद्दलचे आहेत. आमच्या गेल्या वर्षाबद्दलचे.

जेव्हा माझा गोडुला नवरा सर्दीनं होतो बेजार,
तेव्हा हाच पदार्थ मिळवण्यासाठी मी गाठते बाजार

उत्तर : प्रेसिडन्ट स्ट्रीटवरच्या 'थाई टाऊन'मध्ये मिळणारं टॉम यम सूप. तिथला मॅनेजर ते सूप आणि माझा पुढचा क्ल्यू घेऊन आज दुपारी तयार असेल.

आणि मॅक्मॅन्स चायनाटाऊनमधलं आणि सेन्ट्रलपार्कमधला ॲलीसचा पुतळा. आम्ही सगळ्या न्यूयॉर्कमध्ये फिरू. शेवटी आम्ही फुल्टन स्ट्रीटवरच्या मासळी बाजारात पोहोचू, तिथून आम्ही दोन सुरेख लॉब्स्टर घेऊ आणि ते डबे

माझ्या मांडीवर घेऊन मी निक्च्या शेजारी टॅक्सीत बसेन. आम्ही पटकन घरी येऊ आणि मी ते नवीन भांड्यात घेऊन आमच्या जुन्याच गॅसवर ठेवीन आणि केप कॉडला खूप उन्हाळे घालवल्याच्या सफाईनं काम करीन. निक् मात्र जरासा घाबरल्याचा आव आणून किचनच्या दाराशी असेल.

मी बर्गर सुचवलं होतं. निक्ला मात्र एखाद्या पंचतारांकित, वेगवेगळे पदार्थ असणाऱ्या अशा हॉटेलमध्ये जायचं होतं. लॉब्स्टर हा दोन्हीचा सुवर्णमध्य आहे. लॉब्स्टर म्हणजे जे सगळे आम्हाला लग्नाबद्दल सांगतात ती गोष्ट आहे : तडजोड!

आम्ही लोण्यात शिजवलेले लॉब्स्टर खाऊ आणि आमच्या जुन्या जॅझ रेकॉर्डमधली बाई आमच्यासाठी खोल आवाजात गात असताना, तिथं फरशीवरच प्रेम करू. आम्ही चांगल्या प्रतीची स्कॉच घेऊन सावकाशपणे झिंगू. मी त्याला त्याची भेट देईन-त्याच्या नावाची आद्याक्षरं असणारे क्रेन आणि कंपनीमधले कागद, जे त्याला केव्हापासून हवे होते. जाड गुळगुळीत कागदावर हिरव्या रंगातली स्पष्ट अक्षरं मिरवणारे, जे त्याचे शब्द तोलून धरतील. लेखकासाठी कागद . न जाणो लेखकाच्या बायकोला एखादं प्रेमपत्र मिळेलही, कोणी सांगावं.

मग परत कदाचित आम्ही प्रेम करू. मग उशिरा रात्री एखादा बर्गर. आणखी स्कॉच. ओहो : जगातलं सगळ्यात आनंदी जोडपं! आणि सगळे म्हणतात लग्न कठीण आहे.

◆

नवी संहिता... नवा आशय...

दि कृष्णा की

अश्विन सांघी

अनुवाद

डॉ.मीना शेटे-संभू

महाभारताच्या महानाट्याला समकालीन
कथाबांधणीत गुंफणारी अफलातून कादंबरी...

किंमत : ६५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

कालचक्राचे रक्षक

अश्विन सांघी

अनुवाद

संकेत दि. लाड



कालचक्राचा रहस्यमय इतिहास आणि बौद्ध
अध्यात्माची उजळणी करत धर्मवादावर उपाय
शोधणारी दर्जेदार कादंबरी

किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



द मदर

पर्ल एस. बक

अनुवाद

भारती पांडे

आई...नवरा असूनही झाली विधवा...मातृत्वाचा वसा मात्र जपला...एका आईच्या जीवनाचं बहुपदरी भावनाट्य

शेतात पेरलेलं बी उगवून फुलावर आलं. वाऱ्यामध्ये सुगंध भरायला लागला. तेलासाठी पेरलेल्या शिरसाच्या पिकानं समोरच्या दऱ्या पिवळ्याधमक दिसायला लागल्या, तेव्हा आईनं तिच्या चौथ्या मुलाला जन्म दिला. मोठमोठ्या शहरांमध्ये किंवा एखाद्या थोड्या मोठ्या खेड्यांमध्ये असायची तशी सुईणबिईण नव्हतीच त्या लहानशा वाडीमध्ये. वेळ आली की बायकाच एकमेकींना मदत करायच्या. एखादं मूल पायाळू आलं किंवा एखाद्या पहिलटकरणीला धक्का बसावा असं काही घडलं, काहीतरी बिघडलं, तर गावातल्या आज्या होत्याच काय करायला हवं आणि काय नको ते सांगायला; पण आई चांगली मजबूत होती, चणीनं अगदी लहानखुरी नव्हती की बारीकशीही नव्हती. तिचे सांधे आणि मांड्याही

लवचिक होत्या. तिला कधीही कसलंही आजारपण यायचं नाही. अगदी घसरून पडल्यामुळे तिला आपलं मूल गमवावं लागलं होतं, तेव्हाही तिला फारसा त्रास झाला नव्हता.

एक मूल गमावल्याचं दु:ख आणि आपले इतक्या महिन्यांचे कष्ट वाया गेल्याचं दु:ख तेवढं तिला झालं, बस!

तिची वेळ आली की ती चुलतदिराच्या बायकोला हाक मारायची आणि तिची वेळ आली, की आईही तिच्या हाकेला जायची. आता वसंत ऋतूमधल्या एका छानशा सकाळी या बाईला जाणवलं की आपली वेळ जवळ आलीये, तेव्हा ती शेतातून घरी आली. घराच्या भिंतीला तिने आपलं फावडं उभं केलं आणि मग रस्त्यापलीकडेच राहणाऱ्या आपल्या चुलत जावेला हाक मारली. ती जवळच्या तळ्याशी कपडे धूत होती. तशीच कमरेच्या मोठ्या रुमालाला हात पुसत ती धावतच आली. ही चुलत जाऊ स्वभावानं चांगली, प्रेमळ होती. गोलगरगरीत तपकिरी चेहरा, वर उचलल्या गेलेल्या काळ्या नाकपुड्या आणि त्याखाली लालचुटुक जिवणी असं तिचं रूप होतं. ती सतत कामात असायची. गप्प असणाऱ्या नवऱ्याशी सतत बोलत असायची. ती आली ती हसत आणि मोठ्यानं बोलतच आली. ''बघ ताई, मी म्हणते नेहमी ते बरोबर आहे की नाही... आपली दोघींचीही वेळ एकदम येत नाहीये, हे किती चांगलं आहे. मी बघतच होते तुझ्याकडे. वाटायचं कोण आधी बाळंत होतंय, तू का मी; पण या वर्षी मीच थोडा उशीर केलाय. तुझी वेळ आलीसुद्धा आणि माझी नुकतीच सुरुवात झालीये गर्भारपणाला.''

हे सगळं ती खूप मोठ्या आवाजातच बोलत होती. तिची ती पद्धतच होती. आजूबाजूच्या घरातल्या बायका हे ऐकून गमतीनं विचारायला लागल्या, ''आली का तुझी वेळ, बाई? चांगलं होऊ दे गं बाई. छानसा मुलगा होऊ दे.'' एक गप्पिष्ट विधवा थोड्या दु:खानं उद्‌गारली, ''होय गं बाई. नवरा आहे तोवर त्याचा भरपूर वापर करून घे बाई, नाहीतर मी बघ, अजून वय गेलं नाहीये माझं मुलं व्हायचं, पण नवरा कुठंय?''

आईनं काहीच उत्तर दिलं नाही. ती फक्त किंचितसं हसली. तिचा धुळीनं भरलेला चेहरा फिकट झाला होता आणि त्यावर घामाचे थेंब डंवरले होते. ती घरात शिरली. म्हातारी तिच्या पाठोपाठ बडबडत हसत आत शिरली. तिला या घटकेचा आनंद वाटत होता. ''माझी वेळ यायची तेव्हा मी नेहमी म्हणायची,

तुला माहितीचेय सूनबाई, नऊ मुलं जन्माला घातलीयेत मी आणि सगळी अगदी धडधाकट हं! मरेपर्यंत सगळी छान तब्येतीची होती बरं. मी म्हणायचीच ना नेहमी.''

आईला मात्र हे काही ऐकू येत नव्हतं. काहीही न बोलता एक लहानसं स्टूल जवळ ओढून घेऊन ती त्यावर बसली. दोन्ही हातांनी तिने आपले रुक्ष केस मागे सारले, तेव्हा तिचे तळवेही घामानं ओलेचिंब झाले. हा घाम काही शेतातल्या कामानं येणाऱ्या घामासारखा नव्हता. हा घाम या नव्यानं सुरू झालेल्या कळांचा होता. कोटाची किनार उचलून तिनं चेहरा पुसला. आपले लांबसडक जाड केस मोकळे करून तिने पुन्हा एकदा ते घट्ट बांधले. तेवढ्यात आलेली कळ चांगलीच जोरदार होती. ती गप्पपणे पुढे वाकली. वाट बघत.

तिच्या शेजारी बसून म्हातारी बडबड करतच होती. चुलत जाऊ तिच्या बडबडीला हसत होती; पण आई अशी वाकलेली बघितल्याबरोबर तिने धावत जाऊन दरवाजा बंद केला आणि आईशेजारी उभी राहिली. अचानक दरवाज्यावर जोरात खटखट व्हायला लागली. मुलगा दार वाजवत होता. दिवसाढवळ्या घराचं दार बंद झालेलं आणि आपली आई आतच असल्याचं पाहून तो घाबरून गेला आणि मोठ्यानं रडत दार वाजवायला लागला. सुरुवातीला आई म्हणाली होती, ''त्याला थांबू दे बाहेरच. तरच मला थोडी शांतता मिळेल.'' चुलत जाऊ दाराजवळ जाऊन दाराच्या फटीतून ओरडून म्हणाली होती, ''तुझी आई कामात आहे रे. बस थोडा वेळ तिथंच.'' म्हातारीही ओरडून म्हणाली, ''तिथंच थांब रे माझ्या बाळा! न रडता खेळलास तर दाणे घ्यायला मी एक पैसा देईन हं तुला. तुझी आई बघ काय आणणार आहे थोड्या वेळात तुझ्यासाठी.''

पण दिवसा घराचा दरवाजा बंद असलेला बघून मुलगा फारच घाबरून गेला होता. तो आपला हट्ट सोडेना. त्याचं बघून मुलगीही हुंदके देत चाचपडत दाराशी येऊन आपल्या चिमुकल्या मुठींनी दार वाजवायला लागली. अखेरीस आधीच आपल्या कळांनी बेजार झालेली आई चिडून उठली आणि दार उघडून बाहेर जात तिने मुलाच्या एक सणसणीत थोबाडीत लगावली. ''टाक मारून एकदाचा मला. हो, हो मारतोच आहेस तू मला. एकही गोष्ट ऐकत नाहीस तू सांगितलेली आणि आता हे आणखी एक येऊ घातलंय तुझ्यासारखंच मला छळायला...''

पण त्याला मारल्याक्षणीच तिचं मन विरघळलं, तिचा राग शांत झाला आणि ती मऊपणानं म्हणाली, ''ठीकाय, यायचं असेल तर ये आत; पण

बघण्यासारखं काही नाहीये.'' चुलत जावेकडे वळत ती म्हणाली, ''दार थोडंसं उघडंच ठेव. नाहीतर त्यांना माझ्याजवळून दूर गेलोय असं वाटतं. त्यांना सवय नाहीये ना...''

मग ती पुन्हा खाली बसली आणि डोकं हातात धरून मूकपणे तिनं स्वत:ला त्या असह्य कळांच्या स्वाधीन करून टाकलं. मुलगा आत आला; पण त्याला काहीच दिसलं नाही; पण आपली काकू आपल्याकडे आपण मोठी काहीतरी चूक केली असल्यासारखी बघत्येय हे मात्र त्याच्या लक्षात आलं आणि तो वळून बाहेर निघून गेला. ती मुलगी मात्र आत येऊन मातीच्या जमिनीवर आईशेजारी बसली. तिनं आपले हात दुखऱ्या डोळ्यांवर धरले होते.

अशी ती सारी जणं वाट बघत बसली. एक बाई मूकपणे यातना सहन करत आणि दुसऱ्या दोघी वाडीमध्ये घडत असलेल्या या त्या गोष्टींबद्दल बोलत. तो शेवटच्या घरातला माणूस कसा शेताकडे लक्ष न देता जुगारामध्येच गुंतलेला असतो. आज सकाळीच त्याचं आणि त्याच्या बायकोचं कसं मोठं भांडण झालंय. घरातला शेवटचा पैसासुद्धा घेऊन गेला ना तो जुगार खेळायला. ती गरीब बिचारी काय तोंड देणार त्याला. तो निघून गेल्यावर घराच्या उंबऱ्यातच बसून तिनं साऱ्या वाडीला ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजात गाऱ्हाणी सांगायला सुरुवात केली. असं काहीबाही. चुलत जाऊ म्हणाली, ''आणि घरी आणून बायकोला द्यावं, असं काही कधी जिंकलेलाही नाहीये तो. हरतच असतो तो सारखा. म्हणूनच तर ती इतकी रडत असते.'' म्हातारी एक उसासा सोडत जमिनीवर थुंकली आणि उद्‌गारली, ''हो गं बाई, माणूस सारखाच हरत असला, कधीच जिंकत नसला, तर त्याच्यासारखी वाईट गोष्ट नाहीये; पण काही माणसं असतात हं अशी! मला विचार ना. म्हणजे या घरात नाही हं! देवाच्या दयेनं माझा लेक जिंकतोच खेळतो तेव्हा.''

म्हातारीचं बोलणं संपायच्या आधीच आईनं एक मोठी किंकाळी फोडली आणि ती आपल्या मुलीपासून थोडी बाजूला वळली. कमरेची नाडी सैल करत ती बसल्या जागीच थोडी पुढे वाकली. हे बघितल्याबरोबर चुलत जाऊ पुढे धावली. इतका वेळ त्या सगळ्या ज्याची वाट बघत होत्या ते बाळ तिनं सफाईनं हातात झेललं. मुलगा होता.

आईचं म्हणाल तर ती तिथून उठून बिछान्यावर आडवी झाली. एवढ्या श्रमांनंतर आता तिला विश्रांतीची गरज होती. तिला लगेच झोप लागली. ही विश्रांती तिला अगदी गोड वाटत होती. ती झोपली ती अगदी गाढ आणि खूप

वेळ. ती झोपली असताना चुलत जावेनं बाळाला स्वच्छ केलं, गुंडाळलं आणि तिच्या कुशीत आणून ठेवलं. त्याचं बारीकसं रडणं उमटलं, तरी आईला जाग आली नाही. मग चुलत जाऊ आपली कामं उरकायला स्वत:च्या घरी गेली. जाताना म्हातारीला बजावून गेली, ''ती उठली की पोराला पाठव मला बोलवायला.''

मुलगा आला तो ओरडतच आला, ''तुला म्हाईत्येय का काकू, मला भाऊ झालाय?'' त्याच्याकडे हसत बघत ती म्हणाली, ''म्हणजे काय? मीच तर आणलंय ना त्याला?'' आणि हातात साराचा वाडगा घेऊन ती आईच्या घरात शिरली.

तिचं चिडवणं ऐकून मुलगा मात्र विचारात पडला. अखेरीस त्यानं विचारलं, ''म्हणजे तो आमचा नाहीये का?'' त्याचं बोलणं ऐकून सगळ्याच हसल्या; पण म्हातारीचं हसणं सर्वांत मोठ्यांदा फुटलं. आपला नातू किती हुशार आहे, याची तिला जाणीव होती ना! आईनं जावेकडे कृतज्ञतेनं बघत सार संपवलं आणि ती पुटपुटली, ''ताई, किती चांगली आहेस गं तू!''

पण चुलत जाऊ लगेच म्हणाली, ''माझ्या वेळेला तू पण हेच करतेस ना?''

ही वेळ दोघींच्याही आयुष्यात सारखीच असल्यानं आणि पुन:पुन्हा येणार असल्यानं आता त्या दोघींना आपण अधिक जवळच्या मैत्रिणी झालो आहोत, हे जाणवलं.

◆

नवी संहिता... नवा आशय...

ऑशविट्झच्या लहानग्या पोरी

आंद्रा व तातियाना बूची

अनुवाद

रेश्मा कुलकर्णी-पाठारे

जगातल्या सर्वांत मोठ्या क्रौर्याच्या साक्षीदार ठरलेल्या दोन चिमुरड्यांची आत्मकथा, ज्यांनी सत्तरीच्या उतरत्या वयात भावनांना वाट मोकळी करून दिली

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

ऑशविट्झचा फोटोवाला



लूका क्रिप्पा व मॉरिझिओ ओनिस

अनुवाद

वर्षा वेलणकर

हजारो ज्यू कैद्यांच्या नजरेतला मृत्यू कॅमेऱ्यात बंद करत ऑशविट्झचं सत्य जगासमोर आणणाऱ्या फोटोवाल्याची अस्वस्थ करणारी कहाणी

किंमत : ४८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



शीला रावळ

दाऊद, अबू सालेम, छोटा राजन...अंडरवर्ल्डमधील महत्त्वाची नावं...त्यांच्यासारख्या गुन्हेगारांच्या जीवनाचा एका शोधपत्रकाराने निर्भयपणे मांडलेला लेखाजोखा

शत्रू नंबर वन

दुबईच्या शेख रशिद रोडवरचे 'द ग्रॅन्ड हयात' या तेलसमृद्ध शहरातल्या झगमगत्या गगनचुंबी इमारतींमध्येही वेगळं उठून दिसण्याइतके दिमाखदार आहे. इथली 'बनियास ग्रॅन्ड बॉलरूम' अत्यंत आलिशान आहे... एखाद्या नेत्रदीपक समारंभाच्या आयोजनासाठी अगदी आदर्श स्थान. २२ जुलै, २००५ रोजी हा प्रशस्त हॉल अतिशय सुंदर आणि खास पद्धतीने सुशोभित करण्यात आला होता. सर्वत्र शुभ्रधवल, सोनेरी रंग आणि मधूनच गुलाबी रंगछटा डोकावत होत्या. बॉलरूममधल्या टेबलांशी प्रत्येकी आठ निमंत्रितांची

व्यवस्था केली होती. प्रत्येक टेबलाच्या मध्यभागी मोठी नक्षीदार मेणबत्तीदाणी ठेवली होती. त्या प्रत्येक मेणबत्तीदाणीत चार मेणबत्त्या तेवत होत्या. भव्य 'कॅन्डललिट डिनर'साठी मंच सजवला होता. प्रत्येक मेणबत्तीस्टॅन्डच्या तळाशी गुलाबी व पांढऱ्या गुलाबांची सजावट होती. प्रत्येक टेबलवर 'छुवारा' (वाळलेले खजूर) आणि लग्नसमारंभात जो इतर सुकामेवा देण्याची परंपरा आहे त्या सुकामेव्याची आठ पाकिटे ठेवलेली होती. अतिशय विलोभनीय झुंबरांमुळे प्रकाशाच्या विलक्षण रंगछटा तयार झाल्या होत्या. पाहुण्यांना समारंभातील प्रत्येक गोष्ट पाहता यावी, यासाठी सगळ्या कोपऱ्यांमध्ये भव्य 'स्क्रीन' उभारले होते. वर-वधूचा मंच शुभ्र-धवल होता. त्याचे प्रवेशद्वार ऑर्किड व गुलाबी गुलाबांनी सजवले होते. नवविवाहित दांपत्याला बसण्यासाठी व पाहुण्यांना भेटण्यासाठी मंचावर दोन हिरव्या आरामदायी चेस्टरफिल्ड खुर्च्या ठेवल्या होत्या. व्यवस्थित आखणी करून स्थान निश्चित केलेले हजारभर कॅमेरे या समारंभाचा क्षणन्‌क्षण टिपत होते, फक्त बॉलरूममध्येच नव्हे तर तिथे येणाऱ्या कॉरीडॉर्समध्येही.

मी या ठिकाणी दाऊदची थोरली मुलगी माहरुख व पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू जावेद मियाँदादचा मुलगा जुनैद यांच्या लग्नाच्या 'हाय-प्रोफाइल' व ज्यावर बारीक नजर होती अशा स्वागत समारंभाच्या वार्तांकनासाठी आले होते. त्या सायंकाळी मी 'स्टार न्यूज' (आता एबीपी न्यूज) च्या वतीने 'वलीमा'साठी आले होते. आठवड्यापूर्वी मियाँदादची मुलाखत प्रसारित झाली होती, त्या वेळी त्याने चॅनलला या समारंभाचे निमंत्रण दिले होते. इतर चॅनल्समधल्या इतर अनेक वार्ताहरांची हा लग्नसमारंभ 'कव्हर' करायची इच्छा होती; पण त्या सर्वांना नकार मिळाला होता. मला मियाँदादच्या निमंत्रणाचा मान ठेवता येईल किंवा मला आत जाऊ दिले जाईल, अशी मी अपेक्षाही केली नव्हती; पण मी समारंभस्थळी पोहोचले होते. अर्थात ते काही सहजपणे घडून आलं नव्हतं; पण त्याबद्दल अधिक नंतर सांगेन.

मला नवदांपत्याला शुभेच्छा देण्यासाठी मंचावर नेण्याची मी वाट बघत होते. दरम्यान, मी त्या हॉलमध्ये बारकाईने पाहत होते. परिचयाचे चेहरे आणि प्रचंड सुरक्षाव्यवस्था. तिथे दाऊद इब्राहिम—दस्तुरखुद्द डॉन एका बंदिस्त भागात बसला होता. त्याबद्दल मी सुरुवातीला सांगितलं आहेच.

त्या दिवशी डॉनची ती झलक पाहण्याआधी माझ्या मनात त्याची

प्रतिमा होती ती भारतीय दूरचित्रवाहिन्यांवरून पुन:पुन्हा प्रसिद्ध झालेली. 'शारजाहच्या स्टेडिअम'मधल्या गॅलरीत बसून क्रिकेटचा सामना पाहणारा दाऊद... त्याचे जवळचे मित्र व बॉलिवुड सेलिब्रिटींच्या गराड्यातला... प्रत्यक्षात मला तो जरा वेगळा दिसतोय असं वाटलं.

मी साहजिकच त्याच्या दिशेने जायला निघाले. तितक्यात माझ्या शेजारी उभे असलेले फयाज व जबेर— ते माझे लग्न समारंभातले मार्गदर्शक-रक्षक होते— ताबडतोब पुढे सरसावले. दाऊद पूर्णत: पुरुषांसाठी असलेल्या विभागात बसलेला असल्यामुळे तुम्हाला तिथे जाता येणार नाही, असं म्हणून त्यांनी मला थांबवलं.

मी त्यांना म्हटलं की, मला फक्त दाऊद भाईंना 'हॅलो' करायचं आहे.

मग ते डॉनकडे गेले. तिथे त्यांचं दाऊदशी काहीतरी संभाषण झालं. त्यानंतर जबेरने मला येऊन सांगितलं, की समारंभ संपल्यावर ते तुमच्याशी बोलतील.

त्या वेळी रात्रीचा दीड वाजला होता आणि तो समारंभ अजून किमान तासभर तरी चालणार होता. मी दाऊद इब्राहिमच्या मुलीच्या 'वलिमा'ला गेले होते या गोष्टीची साक्ष म्हणून मला फक्त काही 'व्हिज्युअल्स' हवे आहेत, एवढंच फक्त मला त्यांना सांगायचं होतं. मग मी पुन्हा प्रयत्न करून पाहिला. मी नवदांपत्याला शुभेच्छा देतानाचे फोटो किंवा थोडं चित्रीकरण घेऊ शकते का, असं मी त्यांना विचारलं. तुम्ही परवानगी दिल्याखेरीज मी हे फोटो सार्वजनिक करणार नाही, असं मी त्यांना कबूल केलं; पण जबेरचा कठोर नकार होता. त्याने मला पुन्हा तेच उत्तर दिलं, ''मी तुम्हाला विचारून सांगतो.''

आम्ही प्रतीक्षा करत होतो त्यादरम्यान मी त्याला विचारलं की, मी या समारंभाची बातमी कशा प्रकारे दिलेली तुम्हाला आवडेल?

त्यावर जबेरने मला आठवण करून दिली की, इथे प्रवेश मिळालेली मी एकमात्र पत्रकार होते आणि त्याने भिंतीवरच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याकडे नजर टाकली. मला वाटतं सुरक्षा व्यवस्थेतल्या कुणीतरी त्याला त्याच्या डाव्या कानातल्या ब्लूटूथवर पुढच्या सूचना दिल्या असणार; कारण तो पुन्हा माझ्याकडे वळला तेव्हा म्हणाला, ''आप जो ठीक समझो.''

हे अगदी साधं-सरळ पण अर्थपूर्ण उत्तर होतं. आता माझ्या दृष्टीने

अतिशय महत्त्वाचा प्रश्न होता : मी 'ऑन एअर' जाऊन, दाऊद इब्राहिम स्वत: या स्वागत समारंभाला उपस्थित होता असं सांगावं की सांगू नये? सकाळपासून सर्व भारतीय प्रसारमाध्यमे— माझ्या चॅनलसहित— तो लग्नाला हजर नसल्याच्या बातम्या दाखवत होती. समारंभस्थळी कडक पहारा असला तरी जे लोक जवळपासच्या बंदरांमार्गे दुबईत पोहोचले होते त्यांनी कितीतरी आधीपासूनच बाकीची माहिती द्यायला सुरुवात केली होती. २००३मध्ये जागतिक दहशतवाद्यांच्या 'यूएस ट्रेजरी वॉच-लिस्ट' मध्ये दाऊदचं नाव समाविष्ट झालं होतं, ते त्याच्या 'अल-कायदा'शी असलेल्या संबंधांमुळे. त्यामुळे त्याला समारंभस्थळी पाहणे ही आश्चर्याची बाब होती. डॉनने जगभरातील गुप्तहेर संस्थांच्या डोळ्यांत धूळ फेकून आणि प्रतिस्पर्ध्यांच्या बंदुकांच्या चर्चातून बाहेर पडून अखेर 'वलिमा'ला हजेरी लावली होती. माझ्या सूत्रांनी मला पूर्वीच खबर दिली होती की, 'निकाह' २० जुलै रोजीच मक्का येथे संपन्न झाला आहे. तो तिथेही हजर असणार, याबाबत मला जराही शंका नाही.

संयुक्त अरब अमिराती व सौदी अरेबियामध्ये दाऊद पाकिस्तानी व्यापारी म्हणून मुक्तपणे फिरत होता, असं मी ऐकलं होतं. डी कंपनीचे तिथे अनेक वैध व्यवसाय होते. त्यापैकी काही सत्तेतल्या उच्चपदस्थ मंडळींसोबत कथित भागीदारीत होते. त्यामध्ये राजसत्तेचाही समावेश होता, असं म्हटलं जात असे. 'वलिमा'ला त्याची उपस्थिती हे तो लपूनछपून नसल्याचे स्पष्ट निदर्शक होते. वस्तुत: तो दुबईतील सत्ताधिकाऱ्यांना कुठलीही राजनैतिक समस्या निर्माण होऊ नये यासाठी त्याचे 'वलिमा'ला उपस्थित असणे मिरवत नव्हता.

मी अजूनही द्विधा मन:स्थितीतच होते. मी नाराजीचा धोका पत्करून त्याच्या तिथे हजर असण्याची बातमी लगेच तिथल्या तिथे देऊन टाकावी, की त्याला समारंभानंतर भेटण्याची वाट पाहावी... मला संधी होती— अ मॅटर ऑफ चान्स— आणि मला ती संधी टिपायची होती. मी डॉनच्या सुरक्षेची जबरदस्त तटबंदी असलेल्या समारंभात प्रवेश मिळवला होता. त्याला तिथे पाहिलं होतं. तर आता त्याला भेटण्याची व त्याची मुलाखत मिळण्याची शक्यताही होती अजून. त्याचा उजवा हात छोटा शकील १९९४पासून मला दाऊदची मुलाखत घेण्याची व्यवस्था करून देण्याचे कबूल करत होता. त्याचा फोन आला की प्रत्येक वेळी मी त्याला या गोष्टीची आठवण करून द्यायचे आणि प्रत्येक वेळी शकील अगदी फिल्मी स्टाइलमध्ये सांगायचा की, 'एक

बार आप को कमिट किया है तो फिर आप ही को फर्स्ट इंटरव्ह्यू देंगे जब वो तय करेंगे।'

१९९३च्या मुंबई बॉम्बस्फोटानंतर काही काळाने दाऊद 'इंडिया टुडे'शी बोलला होता; पण त्यानंतर तो 'सायलेन्ट मोड'वर गेला. तेव्हापासून त्याने प्रेसला अगदी मोजक्या मुलाखती दिल्या आहेत. तो स्वत: तर प्रसारमाध्यमांपासून दूर राहिला आहेच; पण त्याने त्याच्या भावांनाही कुठल्याही प्रसारमाध्यमाशी संवाद साधायचा नाही, असा आदेश दिल्याचे म्हटले जात होते; कारण फोनवरच्या संभाषणांमुळे ठावठिकाण्याबद्दलचे तपशील समजू शकतात आणि आवाजाचे नमुनेही घेता येऊ शकतात, जे 'मकोका'सारख्या (हा कायदा १९९९मध्ये अमलात आला) संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यान्वये न्यायालयात त्यांच्याविरुद्ध पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाऊ शकतात. त्याचा प्रवक्ता छोटा शकील आणि धाकटा भाऊ इक्बाल कासकर हे दोघंही फोनवरून बिझनेस चालवत असताना भारतीय अधिकाऱ्यांनी कितीतरी वेळा त्यांचा ठावठिकाणा शोधला आहे. त्यानंतर मग प्रदीर्घ कायदेशीर लढायांना तोंड द्यावं लागलं आहे. दाऊद हे टाळणेच इष्ट समजतो; कारण त्याचा अर्थ आहे, त्याच्याविरुद्ध फौजदारी आरोपांची जी भली मोठी यादी आहे त्यात आणखी भर घालणे.

काहीही असलं तरी मी वाट पाहायचं ठरवलं. म्हटलं पाहू या, नशिबाने साथ दिली तर समारंभानंतर आपल्याला त्याची मुलाखत मिळेलही.

❋

दाऊदच्या मुलीच्या लग्नाच्या स्वागत समारंभाची बातमी फुटली तसा प्रत्येक-जण तो समारंभ 'कव्हर' करू इच्छित होता. व्हिसासाठी अर्जांची गर्दी उसळली; पण सगळे अर्ज नाकारले गेल्यामुळे अनेकांची निराशा झाली. 'स्टार न्यूज' मध्ये आम्ही समारंभाआधी आठ दिवस, सहा व्हिसांसाठी अर्ज केले; पण एकही व्हिसा मिळाला नाही. आमचे पासपोर्ट कसल्याही स्पष्टीकरणाविना परत करण्यात आले. प्रसारमाध्यमांतील काहीजण विमानाने शारजाहला, तर काहीजण अबूधाबीहून विमानाने दुबईला गेले.

दरम्यान, 'स्टार न्यूज'ने दुबईतल्या सतीश व्ही. एम. या मुक्त पत्रकाराला या समारंभाचे 'कव्हरेज' घेण्याचे काम दिले होते. २२ जुलै रोजी (म्हणजे 'वलिमा'च्या दिवशी) दुपारच्या संपादकीय मीटिंगमध्ये मी 'स्टॉपओव्हर' पर्याय म्हणून दुबईला जावे असा निर्णय झाला. माझ्याकडे 'शेंगन' देशात व अमेरिकेत

प्रवास करण्यासाठी वैध व्हिसा होते. माझी रात्री ८च्या दुबईमार्गे लंडनला जाणाऱ्या लुफ्थान्साच्या विमानात जागा आरक्षित झाली. माझे संपादक उदय शंकर यांचा आग्रह होता की, ही शेवटची संधी आहे आणि ती टिपलीच पाहिजे; पण मला मात्र अजूनही कळत नव्हतं की, संयुक्त अरब अमिरातीचा व्हिसा नसताना मी दुबईच्या विमानतळावरून कशी काय बाहेर पडणार होते?

दुपारी तीनच्या सुमाराला मला आरएसचा फोन आला. ते सामाजिक कार्यकर्ता व राजकारणी आहेत. त्यांना माझ्या आवाजावरून काहीतरी अस्वस्थता जाणवली असणार; कारण त्यांनी मला 'काय झालंय' असं विचारलं. मग मी त्यांना सांगितलं की मला एका महत्त्वाच्या 'कव्हरेज'साठी संध्याकाळी दुबईला पोहोचायचं आहे; पण माझ्याकडे प्रवास परवाने नाहीत. हे कळताच त्यांनी ताबडतोब मदतीचा हात पुढे केला.

आरएस देवदूतासारखे आले. त्यांनी मला दुबईतला एक नंबर दिला आणि त्या नंबरवर माझ्या पासपोर्टची प्रत फॅक्स करायला सांगितले. त्यांनी सांगितलं की, दुबईत त्यांच्या नातेवाइकांच्या मालकीचं एक हॉटेल आहे. ते लोक खूप प्रभावशाली असल्यामुळे ते आजच्या आज व्हिसाची पूर्तता करून देण्यात मदत करू शकतील. त्यांनी मला तासाभरात माझे व्हिसा लेटर येईल, याची हमी दिली आणि मला दुबईत प्रवेश करता येईल, याची खात्री दिली.

मग मी त्यांच्या भरवशावर माझ्या घरी गेले. बॅग भरली आणि आतुरतेने त्यांच्या फोनची वाट पाहू लागले. त्यांचा मला पुन्हा फोन आला; पण हे विचारायला की, मी यापूर्वी कधी दुबईला गेले होते का आणि तिथल्या अधिकाऱ्यांशी कुठला विवाद किंवा समस्या आली होती का? त्यावर मी त्यांना ही माझी पहिलीच दुबईवारी असेल, असं सांगितलं. मग त्यांनी मला सांगितलं की, तुमचं नाव 'ब्लॉक्ड ट्रॅव्हलर्स'च्या यादीत असल्यामुळे या कामाला थोडा वेळ लागतोय. (दाऊदची दुबईतील अधिकाऱ्यांपर्यंत, त्यांना पत्रकारांचे व्हिसा नाकारायला लावण्याइतकी पोहोच दिसत होती.) पण, त्यांच्या नातेवाइकांनी व्यक्तिशः माझी जबाबदारी घेतली होती, त्यामुळे तासाभरात मला व्हिसा मिळणार होता. त्यांनी मला विमानतळावर जायला निघा आणि पत्राची वाट बघा असं सांगितलं.

घड्याळाचे काटे टिकटिकत होते. आता चांगलंच दडपण येऊ लागलं होतं. मी विमानतळाकडे निघाले. वाटेत मला दुबईच्या हॉटेलचा फोन आला.

हे हॉटेल माझ्या प्रवास परवान्याचे काम करत होते. फोनवर तिथल्या बाईने मला सांगितले की, मला तुम्हाला परवाना फॅक्सने पाठवायचा आहे. मग मी वाटेत फॅक्स सुविधा असलेले एक दुकान शोधले आणि मला ते पत्र फॅक्सने मिळाले. मी अगदी खूश झाले. हे नक्कीच सकारात्मक लक्षण होते.

मी रात्री साडेदहा वाजता दुबईला पोहोचले. आरएसनी मी तिथे सुखरूप पोहोचले ना, हे विचारण्यासाठी पुन्हा फोन केला आणि माझ्यासाठी बाहेर कार उभी असल्याचं सांगितलं. मला कुठलाही प्रश्न न विचारता इमिग्रेशनमधल्या अधिकाऱ्याने माझ्या पासपोर्टवर शिक्का मारला तेव्हा मला प्रचंड सुटल्यासारखं वाटलं. तो सगळा दिवस तणावात गेला असला, तरी अखेर मी माझ्या 'मंजिल'पर्यंत पोहोचले होते. बाहेर ४८ डिग्री तापमान होतं. मला अक्षरश: भट्टीतून चालल्यासारखं वाटत होतं. विमानतळाबाहेर माझ्यासाठी काळी मर्सिडिज थांबली होती. ड्रायव्हरने मला, 'तुम्हाला आधी हॉटेलवर जायचं आहे का' असं विचारलं; पण मी थेट 'वलिमा' स्थळी जायचं ठरवलं. स्वागत समारंभ तासाभरापूर्वीच सुरू झाला होता. आता माझं चित्त फक्त एकाच गोष्टीवर केंद्रित होतं, ती म्हणजे मला हॉटेलच्या 'बॅन्क्विट हॉल' मध्ये प्रवेश कसा मिळेल?

◆

नवी संहिता... नवा आशय...

अमर हृदय

सेरदार ओस्कान

अनुवाद

डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

खुसखुशीत छोट्या छोट्या गोष्टींतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान

किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

उजळे जगाच्या दीप

सेरदार ओस्कान

अनुवाद

अजित कुलकर्णी



खुसखुशीत छोट्या छोट्या गोष्टींतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

रुमी: आनंदघन

सेरदार ओस्कान

अनुवाद

प्रमोद नाईक



खुसखुशीत छोट्या छोट्या गोष्टींतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान

किंमत : २४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



दि रोझाबल लाइन

अश्विन सांघी

अनुवाद

संकेत दि. लाड

सर्वधर्मांच्या परस्परसंबंधांची नाळ उलगडत जाणारी अश्विन सांघी यांची अभ्यासपूर्ण कादंबरी

लडाख, भारत १८८७

दिमित्री नोविकोव दमला होता.[६] श्रीनगरपासून सुरू झालेल्या ३,५०० मीटर उंचीवरील झोजी-ला खिंडीमार्गे लडाखला पोहोचण्याच्या त्याच्या मोहिमेमध्ये सामान आणि साहित्याचा भार इतर लोकांनी उचलला असला, तरी ही मोहीम दमवणारी होती. पुढे लडाखची राजधानी लेह आणि तिथून पुढे हेमिसपर्यंतच्या खडतर प्रवासानं त्याची सगळी ऊर्जा शोषून घेतली होती. त्यातच भर म्हणजे, त्याला घेऊन जाणाऱ्या खेचरावरून पडल्यानं त्याचा उजवा पायही दुखावला होता.

हेमिस मठ लडाखमधील सर्वाधिक आदरणीय बौद्ध मठांपैकी होता आणि तिथे या पर्यटकाचे सन्माननीय पाहुण्यासारखे स्वागत केले गेले. तेथील

भिक्खूंनी तातडीने त्याला उचलून त्यांच्या साध्याशा विश्रांतीकक्षामध्ये नेले आणि त्याच्या दुखापतीची शुश्रूषा करण्यास सुरुवात केली. त्याला अक्रोड आणि जर्दाळूंचा खुराक आणि त्याच्या बरोबर गरम 'पो चा' म्हणजेच लोण्याचा चहा दिला. फराळ चालू असतानाच त्याची भेट या मठाच्या प्रमुख लामांशी झाली.

''तू इथे का आला आहेस, हे मी जाणतो बाळा'', लामा म्हणाले. ''आम्हीही देवाच्या सुपुत्राचा सन्मान करतो.''

दिमित्री अवाक् झाला. त्याने इतक्या थेट प्रतिसादाची अपेक्षाच केली नव्हती. ''मला 'इस्सा'बद्दल माहिती सांगणारी लिखिते पाहता येऊ शकतील का?'' त्याने सावधपणे सुरुवात केली.

सुज्ञ लामांनी दिमित्रीकडे पाहून प्रश्नार्थक स्मित केले आणि ते शांतपणे उत्तरले, ''युद्धाचा मार्ग न अवलंबता जगाच्या अनेक भागांमध्ये आपल्या सुंदर धर्माचे ज्ञान पोहचवू शकलेला महान 'इस्सा' निश्चितपणे बुद्धाच्या आत्म्याचा अवतार होता. 'इस्सा' हा सन्माननीय प्रेषित होता आणि त्याने बुद्धाच्या तत्पूर्वीच्या बावीस अवतारांनंतर जन्म घेतला. तू आत्ता ज्यांच्याबद्दल विचारणा केलीस त्या ग्रंथांमध्ये त्याचे नाव, त्याचे जीवन आणि त्याचे कार्य नोंदवण्यात आले आहे. मात्र, सर्वप्रथम तू विश्रांती घे आणि या दुखापतीतून बरा हो.''

दिमित्रीच्या पायांतून कळा येत होत्या. बौद्ध भिक्खूंनी विविध औषधी झाडपाले आणि लेप लावून पाहिले, पण त्याचा तितका परिणाम होत नव्हता. दिमित्रीने आपल्या कळांकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करून लामांसोबतचा त्याचा उत्स्फूर्त संवाद पुढे सुरू ठेवला.

लामांनी त्यांच्या हातातलं प्रार्थनाचक्र फिरवायचं थांबवलं आणि म्हणाले, ''मुस्लिम आणि बौद्धांमध्ये साधर्म्य सापडत नाही. बौद्धांनी इस्लाम धर्मात प्रवेश करावा, यासाठी मुस्लिमांनी हिंसाचार आणि युद्धांचा वापर केला. ख्रिश्चनांनी मात्र असे कधीही केले नव्हते. त्यामुळे त्यांना मानद बौद्ध मानले जाऊ शकते! आता मात्र ख्रिश्चनांनी आपली पाळंमुळं विसरायचं ठरवलं असून ते बौद्ध तत्त्वांपासून अधिकाधिक दूर जात आहेत, हे पाहणे खरंच क्लेशदायक आहे!''

दिमित्रीला दरदरून घाम फुटला. लामांचे शब्द हे वर्षानुवर्षांच्या पारंपरिक सुज्ञतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत होते. त्यांचा शोध किती महत्त्वाचा होता याची दिमित्रीला जाणीव झाली, मात्र त्याचवेळी या ज्ञानाचा परिचय पाश्चात्य

जगाला करून देण्याचे धोकेही त्याला माहीत होते. त्याच्यावर खोटारडा किंवा द्रोही असल्याचा शिक्का बसला असता. त्याचे शब्द धर्मनिंदा करणारे असल्याचे मानले गेले असते. त्यामुळेच त्याला पुढची वाटचाल काळजीपूर्वक करावी लागणार होती.

दिमित्रीने लागलीच, लामा उल्लेख करत असलेले पवित्र लिखाण आपल्याला पाहता येऊ शकेल का, असे विचारले. लामांनी त्याच्याकडे पाहून स्मित केले. ''संयम हा बौद्धसद्‌गुण आहे, बाळा'', ते म्हणाले. ''संयम.''

दिमित्रीने शक्य होता, तितका संयम बाळगला. लामा ज्याविषयी बोलले होते, ते 'इस्सा'संबंधीचे लिखाण पाहण्यासाठी त्याने अनेक दिवस प्रतीक्षा केली. आता त्याची अपेक्षा लपून राहणे कठीण बनले होते आणि अधिक विलंब न करता त्या हस्तलिखितांविषयी विचारण्याची त्याला अतीव इच्छा होत होती. अखेर आज त्याला त्याच्या संयमाचा मोबदला मिळाला होता. लामांनी त्याला बौद्ध इतिहासकारांनी तिबेटियन भाषेत लिहिलेली अनेक पुरातन भूर्जपत्रे आणून दिली.

या पत्रांचा अनुवाद करण्यासाठी दुभाष्याला बोलावण्यात आले आणि त्यानुसार दिमित्री ती उतरवून घेण्याचा प्रयत्न करू लागला.

या पत्रांमध्ये 'ज्युदेआ' मध्ये जन्मलेल्या 'इस्सा' या मुलाची कथा सांगण्यात आली होती. या कथेनुसार साधारणत: चौदाव्या वर्षी हा मुलगा भारतामध्ये बौद्ध शिकवणीचा अभ्यास करण्यासाठी आला. त्याच्या प्रवासादरम्यान तो सिंध प्रांतात गेला, तिथून पंजाबमध्ये व अखेरीस सम्राट अशोकाची पुरातन राजधानी मगधमध्ये आला. इथे त्याने हिंदू धर्मातील ज्ञानग्रंथ असलेल्या वेदांचा अभ्यास केला. मात्र, हिंदू धर्मातील कर्मठ जातिव्यवस्थेनुसार हिंदू ब्राह्मणांनी 'अस्पृश्य' मानलेल्यांना 'इस्सा'ने वेद शिकवण्यास सुरुवात केल्यामुळे त्याला मगधमधून बाहेर काढण्यात आले.

'इस्सा'ने त्यानंतर बौद्ध मठांमध्ये आश्रय घेतला आणि बुद्धाच्या भाषेमधून पालीमधून बौद्ध ग्रंथांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यानंतर, तो पर्शियामार्गे ज्युदेआला घरी परतण्यास निघाला. पर्शियामध्ये असताना त्याने झोराष्ट्रीयन धर्मगुरूंचा रोष ओढवून घेतला. जंगलामध्ये रानटी श्वापदे त्याला

जिवंत खाऊन टाकतील, या अपेक्षेने त्यांनी 'इस्सा'ला जंगलात हाकलले.

अखेरीस वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी तो जुदेआमध्ये पोहोचला. तो इतकी वर्षे परदेशात असल्यामुळे त्याला तिथे कोणीच ओळखत नव्हते. ते विचारायचे, 'तू कोण आहेस आणि तू तुझ्या कोणत्या देशातून आमच्या देशामध्ये आला आहेस? आम्ही तुझ्याबद्दल कधीच ऐकलेले नाही आणि आम्हाला तर तुझे नावही माहीत नाही.'

'इस्सा' सांगायचा, 'मी इस्रायली आहे आणि जन्मलेल्या दिवसापासून मी जेरुसलेमच्या भिंती पाहिल्या आहेत, गुलाम बनवण्यात आलेल्या माझ्या भावांचे रडणे आणि मूर्तिपूजकांनी बंदी बनवून नेलेल्या भगिनींचे कण्हणे मी ऐकले आहे. लहान असतानाच मी इतर देशांत जाण्यासाठी माझ्या पित्याचे घर सोडले होते. मात्र, माझे भाऊ आता अधिकच यातना सोसत आहेत, हे ऐकून माझ्या बंधूंना मी त्यांच्या पूर्वजांच्या श्रद्धेची आठवण करून देऊ शकेन, यासाठी मी माझ्या मात्या-पित्याचे घर असलेल्या भूमीवर परतलो आहे.'

हे समजल्यानंतर विद्वान लोक इस्साला विचारायचे, 'असं म्हटलं जातं की तू मोझेसचे कायदे नाकारतोस आणि लोकांना ईश्वराच्या मंदिराचा त्याग करण्याची शिकवण देतोस.'

आणि 'इस्सा' म्हणायचा, 'आपल्याला ईश्वराने जे दिले आहे, ते आपण नष्ट करू शकत नाही. मोझेसच्या कायद्याबद्दल बोलायचे झाल्यास, लोकांच्या अंतःकरणात ते पुनर्प्रस्थापित करण्याचा माझा प्रयत्न आहे आणि माझे तुम्हाला सांगणे आहे, की तुम्ही त्यांच्या खऱ्या अर्थाविषयी अनभिज्ञ आहात. हे कायदे सूड नाही, तर क्षमाशीलता शिकवतात.'[७]

दिमित्री आधी उत्साहित झाला, मग स्तिमित झाला. आता या शोधावरून मागे फिरणे नाही, हे त्याला माहीत होते. त्याने हातात धरलेले साहित्य हा मागील दोन सहस्त्रकांमधला सर्वांत जबरदस्त खुलासा आहे, हे त्याला आता कळून चुकले होते.

हा खुलासा होता 'इस्सा' विषयी. 'इस्सा' हे हिब्रूमधील 'येशूआ' चे अरबी रूप होते व तोच 'जिझस' म्हणूनही ओळखला जात होता.

◆

पुस्तकाच्या पानांतून



सियालकोट गाथा

अश्विन सांघी

अनुवाद

तृप्ती कुलकर्णी

फाळणीच्या दर्दभऱ्या अनुभवांमधून प्रवास करत नवं समाजभान निर्माण करणारी कादंबरी

पाटलीपुत्रातले रस्ते शांतपणे पहुडले होते. रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या मद्यशालांनीही त्यांच्या अखेरच्या ग्राहकांना घरी पाठवले होते. नगराला वेढणाऱ्या अजस्र तटबंदींची चौसष्ट द्वारे रात्रीपुरती बंद करण्यात आली होती. सभोवती असणारा खंदक पार करून येणाऱ्या अनाहूतांवर त्या अजस्र भिंतींवरील स्वतंत्र मनोऱ्यातील पाचशे सत्तर रक्षक कडा पहारा ठेवून होते.

नगराच्या मध्यभागी भव्य उद्याने आणि जलाशयांच्या कुशीत वसलेले राजगृह उभे होते. राजसैनिकांचा सुसज्ज पहारा असणारी राजगृहाची द्वारे कडेकोट बंद होती; पण एक गुप्त द्वार मात्र खुले होते. दर पौर्णिमेच्या रात्री एकदा त्याचा वापर व्हायचा.

तोदेखील निवडक खास नऊ व्यक्तींकडून...

राजगृहात, सम्राट अजून जागाच होता. तो क्वचितच झोपत असे आणि याचा अर्थ त्याच्या भवतालच्या लोकांनाही आपली झोप गमवावी लागत असे. तो मंत्रणा कक्षाच्या शीर्षस्थानी विराजमान झाला होता. सम्राट त्या नऊ खास व्यक्तींबरोबर विचारविनिमय करत होता तेव्हा जमिनीत रोवलेल्या पेटत्या पलित्यांमुळे कक्षाच्या भिंतींवर सावल्या नाचत होत्या.

अशोकाचं व्यक्तिमत्त्व काही फार आकर्षक नव्हतं; किंबहुना अनेकांना तर तो अनाकर्षकच वाटत असे. पूर्वी, अशोक म्हणजे अदम्य उत्साहाचा एक झरा होता, पण आजकाल तो उत्साहाचा झरा जणूकाही आटूनच गेला होता.

कलिंगाने त्याला बदलून टाकले होते.

कलिंग अशोकाच्या डोळ्यांत ठळकपणे सलणारा काटा होता आणि अनेक वर्षांपूर्वी सरतेशेवटी त्या संघराज्याचा काटा उपटून काढण्यात तो यशस्वी झाला होता.

अशोकाचे पिता आणि पितामह यांच्या हातावरही कलिंगाने तुरी दिली होती. खरं पाहता या विजयाचा उत्सव साजरा व्हायला हवा होता.

तरीही हे सर्व इतके व्यर्थ का वाटत होते?

स्वत:च्या एक लक्ष योद्ध्यांना यमसदनी पाठवून अशोकाने कलिंगावर विजय मिळवला होता, आणि कलिंगाचे त्याच्या दुपटीने योद्धे या युद्धात मृत्युमुखी पडले होते. युद्धभूमीच्या सीमेवर असणारी 'दयानदी' या भीषण युद्धानंतर अनेक महिने रक्तरंजित होती.

आणि त्यानंतर सम्राट अशोकामध्ये हे आमूलाग्र परिवर्तन झाले होते. दुष्ट अशोकाचे-सदाचरणी अशोकात रूपांतर झाले होते.

सम्राटाने कक्षातील त्या नऊ व्यक्तींवर कटाक्ष टाकला. त्यांच्यापैकी प्रत्येकजण अशोकाच्या सिंहासनाशी साधर्म्य असणाऱ्या आसनांवरच आसनस्थ झाला होता. त्या कक्षात ना कोणी लहान होते ना मोठे. अशोक विचारात गर्क होता. नियोजित कामगिरीसाठी तो त्यांच्यावर विश्वास टाकू शकणार होता का? ते त्याला ती कामगिरी पार पाडण्याचा शब्द देतील का? आता कोणताच पर्याय शिल्लक नाही, हे लक्षात आल्यावर दीर्घ नि:श्वास सोडून तो म्हणाला,

'अत्यंत चिंताग्रस्त असल्याने मी तुम्हा सर्वांना येथे आमंत्रित केले आहे', त्याने सुरुवात केली. त्यांच्यातील वयोवृद्ध अशा रहस्याच्या रक्षकाने कोणतीच

प्रतिक्रिया दर्शवली नाही. जाडजूड ग्रंथ हातात घेऊन तो सूचनेची वाट पाहत राहिला. ते बाड कापडाचे होते आणि त्याच्या आच्छादनावर जेलीफिशचे चित्र असलेली एक मुद्रा विणलेली होती.

'गेल्या काही वर्षांत आपला शोध आपण जवळपास परिपूर्ण बनवला आहे,' अशोकाने बोलण्यास सुरुवात केली. 'तुमच्या पुढ्यातल्या या विस्तृत ग्रंथात पथप्रवर्तक विचार आहेत. असे सामर्थ्यशाली ज्ञान मिळवण्यासाठी अनेक सम्राट त्यांचे राज्य स्वेच्छेने सोडून देतील. तुमच्या संशोधनामुळे मौर्य साम्राज्य समृद्ध बनले आहे. या ज्ञानाने आपल्याला युद्ध जिंकण्यास, शत्रूंना नामोहरम करण्यास आणि आपल्या प्रजेस एक उत्तम आयुष्य देण्यास समर्थ बनवले आहे.'

तो थबकला. प्रसंगोचित शब्द शोधण्यासाठी तो चाचपडत होता.

'पण... हे पाहा... मी तुमच्या या कार्याचे काय करून ठेवले आहे! माझ्या सत्तेच्या लालसेपायी मी तीन लक्ष लोकांचा बळी दिला आहे. शरम, अपराध आणि पश्चातापाने माझे मन भरून गेले आहे, आणि तुम्हाला माहीत आहे का? तुमच्या या ग्रंथातही माझ्या या परिस्थितीवर कोणताच उपाय नाही.' अशोकाने नजर जमिनीकडे वळवली.

'महाराज, कलिंगयुद्धाला एक दशक उलटून गेलंय. त्यानंतरच्या काळात तुम्ही तुमच्या प्रजेप्रति एका उत्तम पित्याची भूमिका पार पाडली आहे,' रहस्यरक्षक म्हणाला. तो त्यांच्यात सगळ्यात ज्येष्ठ होता. त्याचे नाव 'कालपसिक' होतं. 'कालपसिक' बोलत असताना अशोकाने नजर उचलून त्याच्याकडे पाहिलं.

'तुम्ही धर्मार्थ रुग्णालये स्थापन केली, विद्यापीठ आणि धर्मपीठांना आश्रय दिला, विश्रामगृहे बांधली, हजारो वृक्षांची लागवड केली, कर कमी केले, शासकीय अधिकारी प्रजेशी आपुलकीने व्यवहार करतील, याची खातरजमा केली. कोणत्याही सम्राटाने इतक्या अल्प कालावधीत आपल्या प्रजेसाठी इतके सारे केले नाही.' स्तुतीचा कोणताही आव न आणता 'कालपसिक' म्हणाला.

'कालपसिक' जे काही म्हणाला होता ते सर्व सत्य होते. अशोक खिन्न हसला. 'कालपसिका,' मला प्रोत्साहित केल्याबद्दल धन्यवाद! कर्माच्या या अधोगतीमधून मी कितीही सुटका करून घ्यायचा प्रयत्न केला तरी मी यशस्वी होणार नाही. कधी ना कधी मलाही माझ्या पापांचे मूल्य चुकवावेच लागणार आहे.'

तो पुन्हा थबकला.

'ज्ञान ही शक्ती आहे, हे तुम्हाला माहीतच आहे,' तो म्हणाला. ज्ञानाचा हितासाठी तसेच अहितासाठीही उपयोग केला जाऊ शकतो. कोणत्याही परिस्थितीत आपले हे ज्ञान चुकीच्या हातात पडता कामा नये.'

'देवानामपिय, तुम्हाला नक्की काय म्हणायचे आहे?' अशोकाला, 'देवांना प्रिय असणारा' असे संबोधून तो म्हणाला.

'येणाऱ्या पिढ्यांसाठी तुमच्या या ज्ञानसाठ्याचे आपण जतन करायला हवे. ते कधीच चुकीच्या हातात पडता कामा नये.'

आपण इतके सामर्थ्यशाली ज्ञान कसे बरे जतन करायचे? त्या नऊ व्यक्तींच्या मनातही अशाच विचारांचे काहूर माजले होते. त्यांचे विचार जणू काही वाचत अशोकाने विचारले, 'तर मग एवढे सामर्थ्यशाली ज्ञान आपण कसे जतन करायचे? आपले हे ज्ञान एका माणसाच्या ठायी एकवटले पाहिजे, असे मी सुचवीन. कोण बरं असेल असा माणूस?'

पुन्हा काही बोलण्याआधी अशोकाने प्रत्येकाकडे दृष्टिक्षेप टाकला. 'कालपसिका, ही महत्त्वाची जबाबदारी तुझ्याकडे घेण्यास तू सज्ज आहेस का? तूच या रहस्याचा रक्षक आहेस आणि सगळ्यांमध्ये ज्येष्ठही आहेस. तू हे ज्ञान प्राणांपलीकडे जपले पाहिजेस. तुझ्याकडे काय आहे, याचा तू बाह्य जगाला थांगपत्ता लागू देऊ नयेस.'

'पण मी मर्त्य आहे', कालपसिक म्हणाला, 'मी या संपन्नतेच्या ज्ञानाचे जतन कसे बरे करू शकेन? आपण हे संशोधन आणखी समृद्ध कसं करू शकू? माझ्या मृत्यूनंतर याचे काय होईल?'

'तुझा मृत्यू नजीक आल्यावर तू या ज्ञानाचे संरक्षण करण्यासाठी योग्य वारसाची निवड करायचीस', अशोकाने उत्तर दिले. 'तुझा वारस तुझ्या रक्ताच्या नात्यातलाच हवा असे काही नाही, पण अशा व्यक्तीची निवडही तू करू शकतोस. गुण, प्रामाणिकपणा आणि सामर्थ्य हे तुझ्या वारसदाराचे निकष असतील. तू हे ज्ञान तुझ्या वारसाला पूर्ण गोपनीयतेची शपथ देऊन द्यावेस.'

'कालपसिका'ने संमती दर्शवली.

◆

अभिप्राय

मानवी भावभावनांचे रूपक - ययाति

गेली अनेक दशके वाचकांच्या मनावर गारूड घालणारे वि. स. खांडेकर यांचा २ सप्टेंबर रोजी स्मृतिदिन. नाटकांमध्ये अभिनय आणि दिग्दर्शन करण्याची आवड असणाऱ्या खांडेकरांचं लेखन ध्येयवादी म्हणायला हवं. लालित्यपूर्ण भाषा, रम्य कल्पना, कोटीबाजपणा व समाजहिताचा प्रचार ही त्यांच्या लघुकथांची वैशिष्ट्ये. कल्पनाशक्ती तल्लख असल्याने, लेखनातून मनोरंजन करण्याबरोबर समाजजीवनावर भाष्य करणेही ते सहजपणे साधत. त्यांच्या लेखनातून माणुसकीचा गहिवर दिसून येतोच; पण सोबतच माणसावरील अपार श्रद्धाही त्यातून व्यक्त होते. कादंबरीसह कथा, कविता, लघुनिबंध, समीक्षा, चित्रपट-कथा, नाटक, व्यक्तिचित्रे, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांनी विपुल लेखन केले. त्यांच्या लेखनातून होणारे जीवनदर्शन आणि ध्येयनिष्ठा वाचकांना प्रभावित करतात, म्हणूनच त्यांना मानवतावादी लेखक म्हणून ओळखले जाते. जीवनासाठी कला हे त्यांच्या एकूणच लेखनाचे सूत्र आपल्याला दिसून येईल.

साहित्यक्षेत्रातील कामगिरीबद्दल पद्मभूषण या मानाच्या पुरस्कारासह 'ययाति' या कादंबरीसाठी त्यांना 'ज्ञानपीठ' आणि 'साहित्य अकादमी' अशा दोन पुरस्कारांनी सन्मानित केलं गेलं.

खरं तर रूपक कथा हा साहित्यप्रकार मराठीत कोणी खऱ्या अर्थाने रुजविला असेल तर तो खांडेकरांनी; मात्र एकूणच खांडेकरांच्या साहित्यात मेरुमण्याचे स्थान असलेल्या ज्ञानपीठ पुरस्काराने

सन्मानित झालेल्या 'ययाति' कादंबरीबद्दल जरा जाणून घेऊ या.



या कादंबरीच्या मुखपृष्ठावरील घोड्याच्या चित्राचा काय अर्थ असेल बरं?

हे रूपक आहे. ययातीच्या वाहवत जाण्याचं. काय बरोबर, काय चूक, हे त्याला जेव्हा कळेनासं होतं, त्या अवस्थेत त्याला स्वप्न पडतं. तो एका रथात बसला आहे, रथ एका अरुंद रस्त्यावरून चालला आहे, रस्त्याच्या एका बाजूला उंच पर्वत आणि दुसरीकडे खोल दरी. पाच घोडे रथ ओढत आहेत, ते बेधुंद होऊन धावत आहेत, त्यांच्या या बेधुंदपणाची त्याला भीती वाटते आणि ती भीती खरीही ठरते. एक घोडा बेभान होऊन दरीकडे पळत सुटतो. ययातीच्या प्रयत्नांना दाद न देता, तो घोडा, रथ आणि स्वत: ययाति दरीत पडतात. आणि ययाति झोपेतून खाड्कन जागा होतो... मदिरा आणि मदिराक्षी यात बुडालेल्या ययातीची मन:स्थिती, त्या प्रसंगाची भीती दर्शवणारं हे रूपक अगदी नकळतपणे संयमाचं महत्त्व पटवून देतं.

खरंतर इंद्रालाही पराजित करून स्वर्गावर विजय मिळवणाऱ्या शापित नहुष महाराजांच्या वंशजाची ही कहाणी आहे.

ययाति, देवयानी, शर्मिष्ठा आणि कच ही चार मुख्य पात्रे आणि त्याव्यतिरिक्त अलका, मुकुलिका, माधव, तारका, माधवी, यति, पुरू ही पात्रं खांडेकरांनी आपल्या लेखनशैलीने अतिशय सुंदर पद्धतीने जिवंत केली आहेत. एखाद्या मोठ्या कॅनव्हासवर एखादी आख्यायिका चित्ररूपाने चितारत जावी आणि त्यातील पात्रे आपल्यासमोर प्रकट होऊन संवाद करू लागावीत, असा अनुभव देणारी ही कादंबरी आहे.

'माझी कहाणी मी का सांगत आहे?' या प्रश्नाने कादंबरीची सुरुवात करून खांडेकर जणू आपल्याला सूचित करू इच्छितात की या कहाणीतून तुम्हाला अपेक्षित असं काही मिळणार आहे की नाही हे माहीत नाही; परंतु मी जे काही सांगणार आहे त्यातून तुम्हाला मी मानवी जगण्याचे असंख्य पदर उलगडून दाखवणार आहे... त्यातून कुठला पदर धरून ठेवायचा आणि

कुठला सोडून द्यायचा हा निर्णय सर्वस्वी तुमचा असणार आहे... आणि तो निर्णय तुम्हाला नक्कीच मार्गदर्शक ठरणार आहे.

सुरुवातीपासूनच कादंबरी आपल्याला तिच्याकडे आकर्षित करते. आणि हळूहळू तीत गुंतवत जाते ती अगदी शेवटपर्यंत.

प्रत्येक प्रसंगाचे चित्रण डोळ्यासमोर हुबेहूब चित्रित झाल्यासारखे वाटते. मग ते ययातिचं लहानपणी आईवर रुसणं असो, देवयानी-शर्मिष्ठेचं भांडण असो, अशोकवनातील लता वृक्ष असो, अंगिरसांच्या आश्रमातील कोणताही प्रसंग असो, त-त् करणारा पुरू असो, मद्यपान केलेला ययाति असो वा मरणासन्न अवस्थेतील माधव व त्याचे कुटुंब. प्रत्येक प्रसंग उत्तमरीत्या चित्रित करण्यात आला आहे.

ययाति एक पराक्रमी राजा. कच आणि माधवाचा जिवाभावाचा मित्र, अलकेवर निरपेक्ष प्रेम करणारा आणि तिची काळजी घेणारा तिचा बालमित्र आणि सिंहासनावर आपला थोरला भाऊ यति याचा अधिकार मानणारा धाकटा भाऊ; पण पुढे त्याची भोगवादी वृत्ती त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेला जबाबदार ठरते, जी त्याला नंतर अध:पाताच्या मार्गावर घेऊन जाते. स्वत:च्या स्वार्थासाठी ययाति इतकी खालची पातळी गाठतो की स्वत:ला मिळालेला वृद्धत्वाचा शाप आपल्या ऐन तारुण्यात आलेल्या मुलाला स्वत:वर घेण्याची विनंती करतो.

महाभारतातल्या एका कथासूत्राचा आधार घेत खांडेकरांनी आपली कल्पनाशक्ती व लेखनकौशल्याच्या आधारावर ही अजरामर कादंबरी साकारली आहे. कादंबरी म्हटलं की नायक अन् कथानक या गोष्टी महत्त्वाच्याच. नायकाच्या अवतीभोवती फिरतफिरतच कादंबरीचं कथानक पुढे सरकत जातं; परंतु 'ययाति'मध्ये ययाति जरी नायक असला तरी यति, कच, देवयानी व शर्मिष्ठा यांच्या भोवतीही कथानक फिरतं. भाषेतील आलंकारिकतेमुळे वाचताना कादंबरी भुरळ घालत राहते. ययातीच्या वडिलांना त्यांची मुलं सुखी आयुष्य जगू शकणार नाहीत, असा शाप मिळालेला असतो. त्याचा प्रत्यय ययातीला लग्नानंतर येऊ लागतो. मोठमोठी मनोराज्ये रचत तो सुंदर-लावण्यवती देवयानीशी लग्न करतो; परंतु प्रेमभंगाच्या द्वेषाने पेटलेल्या महाराणी देवयानीकडून त्याचा अपेक्षाभंग होतो; परंतु शर्मिष्ठेच्या रूपाने त्याच्या आयुष्यात एक आशेची पालवी फुटते. शर्मिष्ठेकडून ययातीला खरं प्रेम मिळतं; परंतु क्षणिक. नियतीच्या

मनात काही वेगळंच असतं. शर्मिष्ठा, ययाति व हस्तिनापूरपासून खूप खूप दूर जाते, तेही अनिश्चित काळासाठी. खऱ्या प्रेमाला मुकल्यामुळे व पुत्रवियोगामुळे ययाति दुःखी, अस्वस्थ होतो. तो ना संसारात रमतो, ना राज्यकारभारात. या सर्व गोष्टींच्या परिणामस्वरूप ययाति भोगवादी-विलासी जीवनाकडे वळतो, त्यात तो अगदी देहभान विसरून जातो.

ही कादंबरी ययातीची भोगवादी प्रवृत्ती, प्रेमभंगाच्या आघाताने द्वेषाने पेटून उठलेली देवयानी, शर्मिष्ठेचे निरपेक्ष प्रेम, कचाचा भक्तिभाव, पुरूचे पुत्रप्रेम इत्यादी बाबींवर आधारित आहे. मनुष्य असो, देव असो वा दानव. काम, क्रोध, भोग आणि वासनेच्या कचाट्यातून तो कधीही सुटू शकला नाही, ही गोष्ट कादंबरी नकळतच सांगून जाते. ही कादंबरी माणसाच्या जीवनावर, त्याच्या स्वभाव गुणधर्मांवर प्रकाश टाकते.

कादंबरीतील पात्रांविषयी बोलायचं म्हटलं तर प्रत्येक पात्र हे कमी-जास्त प्रमाणात गुण-दोषांनी भरलेले आपल्याला दिसून येते. ययाति आयुष्यभर खूप भोगविलासी जीवन जगला. राजसुख, मदिरा, स्त्रीसुखाचा पुरेपूर उपभोग घेतला तरीही शेवटी तो अखंड त्याच अग्नीत जळत राहिला. 'वासनेचा अग्नी कधीही शमत नाही, तो दिवसेंदिवस फक्त वाढत जातो,' असचं तो शेवटी म्हणतो. या क्षणी जीवनात फक्त उपभोगी जीवन जगलेला ययातीही प्रश्नचिन्हात पाडतो. तो स्त्रीलंपट आहे; परंतु यास त्याच्याएवढेच जबाबदार ठरतात ते मंदार आणि मुकुलिका. त्यासोबतच त्याची आई आणि कदाचित परिस्थितीही. ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर त्याला जर खऱ्या प्रेमाची वा सुखाची व्याख्या कळली असती तर, कदाचित त्याला योग्य दिशा मिळालीही असती. शर्मिष्ठेनं दोन क्षण तिचा राग आवरला असता, तर तिचं भविष्य कदाचित एवढं खडतर नसतं. शुक्राचार्यांनीही आपल्या लेकीला अहंकाराऐवजी प्रेमाचे, शांतीचे धडे दिले असते तर तिच्या आयुष्यात एवढा एकांत आला नसता. सर्व गोष्टींचा संन्यास घेतलेला यती. अतिशय अघोरी आणि कठोर; पण मनातल्या अभिलाषांवर त्यालाही विजय मिळवता आला नाही. त्यालाही सुख कशात आहे हे आधीच समजलं असतं तर त्याची एवढी फरपट झाली नसती... पण या सर्व जर-तरच्या गोष्टी...

या सर्वांत मला कचाचं पात्र मात्र जरा वेगळ्या मातीतलं वाटलं. एवढ्या मोहाच्या भोवऱ्यात वावरत असूनही तो त्यापासून अलिप्तच राहिला. सर्व

सम्यक गोष्टींवर विश्वास ठेवणारा, जीवनाचा उपदेश देणारा; परंतु शेवटी विरक्तच राहिलेला. यतीसारखा आघोरी, कठोर नाही आणि ययातिसारखा भोगविलासीही नाही, तरीही सत्याच्या अगदी जवळ असलेला; पण तरीही तो संसारिक सुखांपासून वंचित राहिलेला दिसतो आणि पुढे पुरूही काही अंशी त्याच मार्गावर क्रमित असलेला दिसतो; परंतु शेवटपर्यंत एक प्रश्न सतावत राहतो की एवढं आदर्श जगणं खऱ्याखुऱ्या आयुष्यात शक्य असेल का? असो. आपण आपल्याला शक्य तेवढं योग्य मार्गाने चालण्याचा प्रयत्न करत राहायला हवा. आपल्या आयुष्यात कितीही वाईट घडलं तरी त्याबद्दल कुणालाही दोष न देणं ही पुरूची कृती मात्र मनात घर करून जाते.

पौराणिक कथेचा आधार घेऊन लिहिली गेलेली ही कादंबरी आजच्या आधुनिक काळातील माणसाच्या प्रेम, भावभावना, मत्सर, भोगवादी वृत्ती अशा अनेक पैलूंचे दर्शन घडवते.

शेवटी कादंबरीच्या शेवटाचा श्लोक आपल्याला कामेच्छेवरील संयमाचे मूलभूत सूत्र सांगून जातो तो पुढीलप्रमाणे-

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।

कामेच्छा ही अधिकाधिक उपभोगाने शांत होत नाही. यज्ञातील अग्नी हविर्द्रव्यांमुळे (आहुतीमुळे) जसा अधिकच भडकतो, तसेच कामेच्छेचे आहे.

त्यामुळे संयम हे रूपक कादंबरी सार्थ करते, असं वाटत राहतं.

– मयूर पटारे

◆

उत्सव पुस्तकांचा

खिशाला नको खर्चाचा ताण,
पुस्तकांच्या उत्सवाला येऊ दे उधाण...

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांवर...

३५% आणि ५०%
सवलत

वेळ - सकाळी ९.३०
ते रात्री ८.३०

६ ते १५
ऑक्टोबर
२०२३

सवलत किमान ₹१५००च्या
मूळ किंमतीवर!

(एका पुस्तकाची एक प्रत)

(हिच सवलत ऑनलाईन खरेदीसाठी लागू)

मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन
भवनसमोर, पुणे-३०

: (०२०)२४४७६९२४, २४४६०३१३ (वेळ : स.९.३० ते रा.८.३०)

sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
(FREE SHIPPING)

सालाबादप्रमाणे यंदाही ऑक्टोबरमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर भरवल्या जाणाऱ्या आपल्या 'उत्सव पुस्तकांचा' या पुस्तक प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व पुस्तक विक्रेत्यांची नावे आणि पत्ते खालीलप्रमाणे आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे – ४११०३०
९४२२३२३०३९ / ०२० – २४४६०३१३
sales@mehtapublishinghouse.com

मेहता पब्लिशिंग हाऊस
सातारा नगर वाचनालय, राजवाडा, सातारा – ०२
✆ ९८२२११४८५७

मेहता पब्लिशिंग हाऊस
गोखले हॉल, मोरया गोसावी समाधी मार्ग चिंचवड गाव, पुणे ४११०३३
✆ ९९७०९२६५५०

मेहता पब्लिशिंग हाऊस
नाशिक
✆ ९४२०५९४६६५
salesmehtapublishinghouse.com

उदय एजन्सीज
३८२८, घुमारे लेन, श्रीपाद ग्रंथ भांडार समोर, शनी चौक, अहमदनगर -४१४००१
✆९९२२६६४९७९
udayagencies03@gmail.com

साहित्य प्रसार केंद्र
नेहरू मार्ग, सीताबर्डी, नागपूर - ४४००१२
✆९४२२११२७२०
sahityaprasarkendra@rediffmail.com

साहित्ययात्रा
खेवरा सर्कल डी मार्ट जवळ, मानपाडा -ठाणे (पश्चिम)
✆ ९५९४७७८४३७

साहित्य नगरी
साहित्य नगरी ग्रंथ प्रदर्शन, बळवंत वाचनालय, ओरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर
✆ ९८२२७८५८०१

आयडियल पुस्तक त्रिवेणी
छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८
✆८५९१०७९०६९
ideal101@rediffmail.com

मॅजेस्टिक बुक डेपो
भवानी बिल्डिंग, न्यू इंग्लिश शाळेसमोर, ठाणे -४४०६०२
✆९८२०९५५५६७
majesticbookdepotgmail.com

साहित्ययात्रा
वीरा वैभव भाष्टे, आपला बाजार विजया सेल्स समोर, SBI बँके शेजारी, स्टेशन, शिव मंदिर रोड, अंबरनाथ (पूर्व),
✆९६०४५२३८५१

श्री महावीर बुक हाऊस
६७/६९ बाजार गेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई -४००००१
✆९८१९९३४०६०/
९८२१०२३१६९
shreembhrediffmail.com

मनोज पुस्तकालय
५८, काशिपुष्प, क्षिरे कॉलनी, वाडीभोकर रोड, धुळे -४२४००२
✆९४२३४९५८९२/
८८८८४४४४४१
manojpustakalaya@rediffmail.com

ग्रंथ द बुक वर्ल्ड
लेन नंबर ५, राजारामपुरी, मेन रोड जवळ, कोल्हापूर - ४१६००८
✆०२३१-२५३५३५५/
९९२२२९५५२२

अभिषेक बुक सेंटर
गीता भवन, जयस्तंभ रोड, रत्नागिरी
✆९५११९९७५३१
akilsk66gmail.com

शब्दांगण
नगर वाचन मंदिर, सोमवार पेठ, मालवण
✆९०२८८३७९३६
shabdangan31gmail.com

अभिषेक बुक सेंटर
मराठा समाज हॉल, डॉ. आंबेडकर रोड, एस टी स्टँड जवळ, सांगली
✆७२९५०८३७२३
akilsk66gmail.com

अभिषेक बुक सेंटर
वनिता समाज हॉल, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१
✆९८५०८६१६६९
akilsk66gmail.com

नंदादीप सर्व्हिस
२३६/१ साखर पेठ, विणकर गार्डन शेजारी, सोलापूर – ४१३००५
✆९८२२८०७७१५
ramakanthboddul@gmail.com

भावार्थ पुस्तकालय
२०१/२०२,सारथी सक्सेस स्क्वेअर, कर्वे रोड, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरूड - ३८
✆ ९२०९०७६११७
bhavarthathesocialreforms.org

भावार्थ पुस्तकालय
कृशेश्वर दर्शन, डॉमिनोझ पिझ्झा समोर, मुंबई-गोवा हायवे, NH ६६, चिपळूण,पिन -४१५६०५
✆ ७२७६०४०२४८

◆

१६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान खास सवलत

१६ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन

'नाथ हा माझा...', 'रेशीमगाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ५६५/- । सवलत किंमत ४२९/-

---

१६ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन

'रुचिरा भाग-१', 'रुचिरा भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४६९/-

---

१७ सप्टेंबर-अनंत पै यांचा जन्मदिन

'आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र', 'आत्मविश्वासाचा कानमंत्र', 'उत्तम स्मृतींचा कानमंत्र', 'यशाचा कानमंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत ३३७/-

---

१८ सप्टेंबर - लान्स आर्मस्ट्रॉंग यांचा जन्मदिन

'इट्स नॉट अबाउट द बाइक' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १४९/-

---

१९ सप्टेंबर - शरद दळवी यांचा जन्मदिन

'चित्रमय बोधकथा भाग-१(तीन पुस्तकांचा संच)', 'चित्रमय रंगतदार कथा मालिका भाग-११'(चार पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २५८/-

'एकलव्य' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-

---

२१ सप्टेंबर - स्नेहल जोशी यांचा जन्मदिन

'नीलकंठ', 'प्लँचेट', 'तळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-

---

२१ सप्टेंबर - ख्रिस गेल यांचा जन्मदिन

'सिक्स मशिन' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

---

२१ सप्टेंबर - दीपा पोरे यांचा जन्मदिन

'ज्ञानदा निबंधमाला' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ११०/- । सवलत किंमत ६९/-

---

२३ सप्टेंबर - डी.एस. इटोकर जन्मदिन

'A to Z विज्ञान', 'छंदातून विज्ञान', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणी विज्ञानाची', 'खेळणीच खेळणी', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'साधी यंत्रे', 'वाचनातून विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'विज्ञानातील गमतीजमती', 'विज्ञानातील रंजकता' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत १२४०/- । सवलत किंमत ७४४/-

---

२३ सप्टेंबर - रेई किमुरा जन्मदिन

'जॅपनीज रोझ', 'जॅपनीज ऑर्किड', 'जॅपनीज मॅग्नोलिया', 'मी एरिक', 'आवा मारू-टायटॅनिक ऑफ जपान', 'अ नोट फ्रॉम इचियो', 'वादळफूल', 'मदाम बटरफ्लाय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत १७७०/- । सवलत किंमत ११९९/-

---

२६ सप्टेंबर- दिलिप दोंदे यांचा जन्मदिन

'सागरी परिक्रमेचा पराक्रम' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

---

२९ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन

'चित्रमय रंगतदार कथा, भाग-१३', 'जादूचं रबर आणि इतर गोष्टी, तल्लख मोती आणि जंमत गोष्टी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ७६०/- । सवलत किंमत ४५६/-

---

२९ सप्टेंबर - जागतिक हृदय दिन

'चला जाणून घेऊ या! हार्ट अॅटॅक', 'हृदयविकार निवारण', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चला जाणून घेऊ या! ध्यानसाधना', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ७०५/-। सवलत किंमत ४२३/-

---

३० सप्टेंबर-एली वायझल यांचा जन्मदिन

'नाइट' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ९९/-

---

३० सप्टेंबर - जागतिक अनुवाद दिन

सर्व अनुवादित पुस्तकांवर ३५ टक्के सवलत.

(किमान खरेदी १०००रु.)

खालील संचांवर १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत

१ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन

'संवादु अनुवादु', 'केतकरवहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ७४०/- । सवलत किंमत ४४४/-

---

१ ऑक्टोबर - अपर्णा वेलणकर यांचा जन्मदिन

'फॉर हिअर, ऑर टू गो?' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-

---

१ ऑक्टोबर - डॉ. व्ही अरविंद यांचा जन्मदिन

'दृष्टिदाता' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २५३/-

---

२ ऑक्टोबर - गांधी जयंती

'दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'मोहनदास', 'फ्रिडम ॲट मिडनाइट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १७००/- । सवलत किंमत १०६०/-

---

३ ऑक्टोबर - गुरुचरण दास यांचा जन्मदिन

'द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४४९/-

---

८ ऑक्टोबर - तहमिमा अनम यांचा जन्मदिन

'आहे कट्टर तरी...', 'तेच दिन सोनेरी...', 'झुबेदा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ८४९/-

---

९ ऑक्टोबर - सुधा मेनन यांचा जन्मदिन

'आघाडीचे महिला नेतृत्व', 'दिव्यगुणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५७५/- । सवलत किंमत ३४९/-

---

१० ऑक्टोबर - आर.के. नारायण यांचा जन्मदिन

'हलवाई', 'वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३४९/-

---

१२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन

'आंधळी', 'आंधळ्याचे डोळे', 'अनोळख', 'अनुबंध', 'चौघीजणी', 'गवती समुद्र', 'गोंदण', 'कविता स्मरणातल्या', 'किनारे मनाचे', 'लेखक आणि लेखने', 'मेघदूत', 'निमित्तानिमित्ताने...', 'पावसाआधीचा पाऊस', 'पूर्वसंध्या', 'रंगरेषा',

'रेशीमरेघा', 'सांगावेसे वाटले म्हणून', 'संस्मरणे', 'सुवर्णमुद्रा', 'वर्षा', 'त्रिवेणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३३०५/- । सवलत किंमत २५२५/-

---

१२ ऑक्टोबर-प्रोतिमा बेदी यांचा जन्मदिन

'टाईमपास' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-

---

१४ ऑक्टोबर - डॉ. अरुण मांडे यांचा जन्मदिन

'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४४/-

---

१५ ऑक्टोबर - डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

'अदम्य जिद्द', 'माझी जीवनयात्रा...', 'टर्निंग पॉइंट्स', 'योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ४१४/-

---

१५ ऑक्टोबर - मारिओ पुझो यांचा जन्मदिन

'ओमेर्ता', 'द लास्ट डॉन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ४४९/-

◆

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्सॲप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

कास्ट मॅटर्स

'कास्ट मॅटर्स' पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनानिमित्ताने राजर्षी शाहू महाराजांच्या कोल्हापुरात रंगला लेखकाशी संवाद

सहभाग :
डॉ. सुरज एंगडे,
खा. कुमार केतकर

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/09/2023 Posting Date : 11/09/2023

आवर्जून वाचावे...

तेलगी स्कॅम
रिपोर्टरची डायरी

संजय सिंह

अनुवाद : **मंजिरी धामणकर**

डान्सबारमध्ये एका वेळी ८४ लाख उडवणारा तेलगी ते संपूर्ण यंत्रणेला भ्रष्टाचाराने पोखरणारा घोटाळेबाज... तेलगी महाघोटाळ्याची पोलखोल करणारा एका शोधपत्रकाराचा थक्क करणारा आँखोदेखा हाल...

ebook available

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____